Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development









***A Multidisciplinary International Level Referred Journal***

***December -2021 Volume-12 Issue-29***

**Chief Editor**

***Dr. R. V. Bhole***

***'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)***



**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***December-2021 Volume-12 Issue-29***

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**EDITORIAL BOARD**

| | | |
|---|---|---|
| ***Nguyen Kim Anh*** | ***Prof. Andrew Cherepanow*** | ***Prof. S. N. Bharambe*** |
| ***[Hanoi] Virtnam*** | *Detroit, Michigan [USA]* | *Jalgaon[M.S]* |
| ***Dr. R. K. Narkhede*** | ***Prof. B. P. Mishra,*** | ***Prin. L. N. Varma*** |
| ***Nanded [M.S]*** | *Aizawal [Mizoram]* | *Raipur [C. G.]* |
| ***Dr. C. V. Rajeshwari*** | ***Prof. R. J. Varma*** | ***Dr. D. D. Sharma*** |
| ***Pottikona [ AP]*** | *Bhavnagar [Guj]* | *Shimla [H.P.]* |
| ***Dr. Abhinandan Nagraj*** | ***Dr. Venu Trivedi*** | ***Dr. Chitra Ramanan*** |
| ***Benglore[Karanataka]*** | *Indore[M.P.]* | *Navi ,Mumbai[M.S]* |
| ***Dr. S. T. Bhukan*** | ***Prin. A. S. Kolhe Bhalod*** | ***Prof.Kaveri Dabholkar*** |
| ***Khiroda[M.S]*** | *[M.S]* | *Bilaspur [C.G]* |

**Published by-** Chief Editor, Dr. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

## CONTENTS


| | | |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा प्रभाव<br>**अमरदिप दामोधर रामटेके प्रा. डॉ. नरेंद्र श्रीधर बागडे** | **1-5** |
| 2 | माझा प्रवास (1857 च्या बंडची हकीकत सांगणारे) प्रवास वर्णन<br>**संजय जनार्दन आगलावे** | 6-8 |
| 3 | महाराष्ट्रीतील मृदाधूप आणि संवर्धन<br>**डॉ. प्रा. कलंदर मुस्तफा पठाण** | 9-12 |
| 4 | भारतीय शेती व्यवसायावर हवामान बदलाचा होणारा परिणाम<br>**डॉ. दिलीप फोके** | 13-15 |
| 5 | कोविड-19 एवं वैक्सिनेशन के प्रति जागरूकता: एक समाज शास्त्रीय अध्ययन (भारतीय संदर्भ में)<br>**डॉ. रानू वर्मा** | 16-24 |
| 6 | प्यार की दर्दभरी दास्ताँ का नाम : अमृता और साहिर<br>**डॉ. डिंपल सुरेश पाटिल** | 25-28 |
| 7 | आंबेडकरवादी कोणाला म्हणावे?<br>**डॉ.प्रकाश जी. कांबळे** | 29-31 |
| 8 | वृत्तबद्धतेचा ध्यास असलेली कविता : 'एखाद्या शब्दासाठी'<br>**प्रा. डॉ. सुरेश पाटील** | 32-36 |
| 9 | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे योगदान<br>**डॉ.एस.डी. सावंत** | 37-39 |
| 10 | पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्रांचे अंतरण<br>**डॉ. संजय नारायणराव कपले** | 40-44 |
| 11 | ग्रामीण एवं शहरी क्षेत्र की कामकाजी महिलाओं की समस्याएं<br>**डॉ. सुनिता गजभिये** | 45-47 |
| 12 | हिंदुस्थानात ग्रंथालय चळवळीचा पाया घालणारा राजा : महाराजा सयाजीराव गायकवाड<br>**प्रा अशोक आकाराम पाटील** | 48-51 |
| 13 | ब्रिटिश सत्तेवर शेवटचा प्रहार करणारं 'भारत छोडो' आंदोलन<br>**प्रा.शिवाजीराव महादेव पाटील** | 52-54 |
| 14 | "शची" - मैथिलीशरण गुप्त के खंडकाव्य की एक पतिव्रता नारी<br>**प्रा. कल्याणकर राजश्री** | 55-57 |
| 15 | प्रयोजनमूलक हिंदी और रोजगार<br>**डॉ. विश्वनाथ महादू देशमुख** | 58-60 |

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,*
*Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December-2021, Volume-12, Issue-29*

# महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा प्रभाव

**अमरदिप दामोधर रामटेके[१] प्रा. डॉ. नरेंद्र श्रीधर बागडे[२]**
[१]संशोधक
[२]मार्गदर्शक उप.प्राचार्य व वाणिज्य विभाग प्रमुख पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यायल, नागपूर
Email- ramtekeamardip@gmail.com

**गोषवारा :**
महिला आणि ऊर्जेचे फार घनिष्ट नाते आहे, ऊर्जा मिळवणे आणि तिचा वापर करणे याकरिता त्यांना बरेच कष्ट करावे लागतात. साधे स्वयंपाकाकरिता जळणासाठी सरपण गोळा करण्याचे उदाहरण घ्या. ऊर्जेची प्राथमिक गरज भागविण्यासाठी देखील महिलांना अनुत्पादक ढोर मेहनत करावी लागते. सर्व विकसनशील राष्ट्रांमध्ये सुमारे ५० टक्के लोकसंख्या स्वंयपाकासाठी लाकडाच्या स्वरूपात घन अशुध्द इंधनावर अवलंबून आहे. त्यात २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भारतात ते प्रमाण ६३ टक्के आहे. घन बायोमास इंधन सामान्यत: पारंपारिक स्वयंपाक स्टोव्हमध्ये किंवा चुलीमध्ये जाळले जाते, ज्यामुळे महिला व लहान मुले पारंपारिक चुलीत जळणाऱ्या इंधनामुळे होणाऱ्या प्रदुषनाचा बळी ठरत आहेत. हि महत्वपूर्ण समस्या लक्षात घेवून २०१६ मध्ये केंद्र शासनाने पीएमयूवाय योजना सुरू केली. ज्याचा हेतू दारिद्र्यरेषेखालील महिलांना एलपीजी कनेक्शन प्रदान करण्याचा होता आणि नंतर सर्व अनुसुचित जाती/जमाती व आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या घटकांपर्यंत वाढविण्यात आला. सदर पेपरमध्ये महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा आणि जिल्ह्यातील विविध ग्रामीण भागात स्वछ इंधनाच्या (एपीजी) प्रवेशाचे विश्लेषन करण्याचा प्रयत्न केला आहे.
**शब्दसंकेत :** पीएमयूवाय, एलपीजी, पहल, गिव्ह इट अप, बीपीएल, उज्ज्वला २.०

**प्रस्तावना :** महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात अनुसूचित जाती/जमाती आणि आर्थीकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांच्या विकासाकरिता शासनाद्वारे योजनेच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये गृहनिर्माण योजना, इतर विकास योजना आणि चंद्रपूर जिल्ह्याचा अर्धा भूभाग हा जंगलांनी व्याप्त असल्यामुळे जंगलालगत असलेल्या गावांना अगदिच २०१५ मध्ये सुरू केलेली 'डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना' याच्या माध्यमातुन गावातील प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ इंधनाची (एलपीजी) पूर्तता केली आहे. जन वन विकास योजने सारखीच नि:शुल्क स्वच्छ इंधनाची (एपीजी) पूर्तता करणारी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २०१६ पासून चंद्रपूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेली एक अलीकडील योजना आहे. पीएमयूवायने चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेवर समिश्र प्रभाव घडवून आणल्याचे दिसून येत आहे. अलिकडेपर्यंत स्वच्छ इंधानाच्या वाढीला गती देण्यासाठी कोणतेही विशेष असे कार्यक्रम किंवा प्रयत्न नव्हते. वर्ष २०१५ पासून, भारत सरकार आणि एलपीजीची मार्केटिंग करणाऱ्या तेल कंपण्यांनी गरीबांना एलपीजीचा वापर सक्रीयपणे करण्यासाठी तीन प्रमूख कार्यक्रम सुरू केले, पहिला कार्यक्रम पहल, दुसरा ''गिव्ह इट अप'' आणि तिसरा प्रधानमंत्री उज्ज्वला योजना (पीएमयूवाय), २०१६ पासून सुरू करण्यात आली. या दरम्यान, दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) कुटूंबातील पाच कोटी महिला सदस्यांना मोफत एलपीजी कनेक्शन देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. त्यानंतर एप्रिल २०१८ मध्ये महिला लाभ्यार्थ्यांच्या आणखी सात श्रेणीचा समावेश करण्यासाठी या योजनेचा विस्तार करण्यात आला व ८ कोटीपर्यंत एलपीजी कनेक्शनचे उद्दिष्ट वाढविण्यात आले. हे लक्ष्य ऑगष्ट २०१९ अगोदर पुर्ण झाले होते. याशिवाय केंद्र सरकारद्वारे ऑगस्ट २०२१ मध्ये 'उज्ज्वला २.०' या योजनेचा शुभारंभ केला या योजनेंतर्गत आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी नवीन पॅकेजींगसह १ कोटी महिलांना एलपीजी दिल्या जाईल.

पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या म्हनण्यानुसार, महाराष्ट्रामध्ये २०१९ पर्यंत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारित प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २.० अंतर्गत ४०. ४३ लक्ष कुटूंबानी गॅस जोडणीचा लाभ घेतला आहे. मात्र, अद्यापही काही कुटूंबे गॅस जोडणीच्या लाभापासून वंचीत आहेत. यातील सर्व कुटूंबाना शोधुन त्यांना केंद्र शासनाच्या

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २.० मध्ये लाभ देण्याबाबत उज्ज्वला योजना सुरू करण्यात आली आहे. हि योजना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. सध्याच्या अभ्यासानुसार महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमाती व आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटकांवर योजनेचा काय परिणाम झाला हे समजुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या उद्दिष्टपूर्तीचे अध्ययन करणे.
२. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा महिलांचे आरोग्य व सामाजिक—आर्थिक घटकांवरील प्रभाव तपासने.
३. चंद्रपूर जिल्ह्यातील स्वच्छ इंधन (एपीजी) वापरातील वाढीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी चन्द्रपूर जिल्ह्यातील एकून १५ ताकुक्यांपैकी ४ तालुके अध्ययनासाठी निडवले आहेत तसेच प्रत्येक तालुक्यातील ५ गावे निवडून त्या प्रत्येक गावातील १० महिला लाभार्थी अशा एकून २०० महिला लाभार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या अधारे माहिती संकलित करून प्राप्त आकडेवारी विश्लेषनात्मक पध्दतीने सादर करण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे व उज्ज्वला योजनेचा चंद्रपुर जिल्ह्यातील महिलांवर काय परिणाम झाला याचा अभ्यास करण्यासाठी पीएमयूवाय लाभार्थीबाबत दुय्यम स्वरूपाची माहिती देखील गोळा केली आहे.

**उज्ज्वला योजनेचा उद्देश**

केंद्र शासनाने उज्ज्वला योजना १ मे २०१६ रोजी देशात आणली त्यामागे विशिष्ट उद्दिष्ट होतं. महिलांच्या तासांचा हिशेब, स्वच्छ हवा, पर्यावरणाचा मुद्दा या सगळ्यांचा यामागे बारकाईने विचार केला गेला. शासनाने देशातल्या पाच कोटी कुटुंबांना २०१९ पर्यंत गॅस जोडणी देण्याचं विशाल लक्ष्य निर्धारित केलं आणि कामाला सुरुवात केली. गरिबांच्या कल्याणाचा नेमका सामाजिक विचार या योजनेमागे केलेला आहे, तो असा—

१. महिलांचे सक्षमीकरण व त्यांच्या आरोग्याची निगा राखणे.
२. स्वयंपाक करताना लाकडी जळण वापरल्यामुळे होणारे तीव्र दुष्परिणाम कमी करणे.
३. स्वयंपाकासाठी अस्वच्छ जळण वापरल्यामुळे भारतात होणारे मृत्यू कमी करणे.
४. घरात लाकडी जळण वापरल्यामुळे लहान बालकांना बऱ्याच मात्रेत होणाऱ्या श्वासोच्छवासाच्या तक्रारी दूर करणे.
५. दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटूबांना नि:शूल्क एलपीजी गॅस जोडण्या उपलब्ध करून देणे.
६. भारतामध्ये स्वच्छ इंधन वापरात वाढ घडवून आणणे.

**संशोधन साहित्याचा आढावा :**प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा महिलांच्या आरोग्यावर आणि सक्षमीकरणावर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी संशोधकाने विविध समकालीन लेख आणि शोधनिबंधाचा अभ्यास केला आहे.

**विवेक आनंद (२०१८)**, यांच्या Two Years of Ujjwala Yojana: Dalits in western UP laud benefits despite resentment against Centre on other issues या अभ्यासात पश्चिम उत्तर प्रदेशातील अनुसुचित जाती व जमाती यावर या योजनेच्या परिणामाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासात त्यांनी प्राथमिक स्तरावर सर्वे करून महिलांची या योजनेच्या संदर्भात असणारी प्रतिक्रिया समोर आणली व योजनेबाबत व्यापक चर्चा घडवून आणुन योजनेने त्यांचे व त्यांच्या कुटूंबाचे जीवन सुकर केले असल्याचे त्यांनी निष्कर्षात म्हटले आहे.

**मयुरा जाधव (२०१९)**, यांनी 'गेम चेंजर' उज्ज्वला' या शोधनिबंधात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या अंतर्गत मराठवाड्यातील चार जिल्ह्यांमध्ये ४०० महिलांशी चर्चा करून भरलेल्या प्रश्नावलीच्या आधारे विश्लेषन केले आहे. याशिवाय गॅस वितरक आणि गॅस एजन्सीचालकांशी झालेल्या चर्चेचाही यात समावेश आहे, घरात गॅस शेगडी आल्यानंतर गॅसचा वापर वाढला आहे. चार जिल्ह्यातले ३६.७५ टक्के लोक आता फक्त एलपीजी वापरतात तर ३२ टक्के लोक एलपीजी बरोबर इतर इंधनाचा वापर करत असल्याचे निष्कर्षात म्हटले आहे.

**वैशाली भोले जयस्वाल, प्रविन यू. मेश्राम (२०१९)**, यांनी Are We Really Out of Chulha Trap: A Case Study from a District of Maharashtra या शोधनिबंधात महाराष्ट्रातील नागपुर जिल्ह्यात ग्रामीण भागात एलपीजीच्या आत प्रवेश आणि स्वच्छ स्वयंपाक इंधनाकडे वळण्यातील अडचणी व आव्हाने यांचे विश्लेषन करण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यासाकरिता त्यांनी ग्रामीण भागातील अशा महिलांची निवड केली आहे, ज्या स्वयंपाकारिता

विविध प्रकारच्या इंधनाचा वापर करतात. सामाजिक, आर्थिक, लोकसंख्याशास्त्र आणि गृहनिर्माण वैशिष्ट्ये या सारख्या अनेक घरगुती मापदंडावर प्राथमिक डेटा गोळा करण्यासाठी ४५० घरांची न्यादर्श पध्दतीने निवड केली. गेल्या काही दशकांमध्ये एचएपीला संबोधित करण्यासाठी भारत सरकारने बरेच घरगुती उपक्रम राबविले, परंतु स्वच्छ इंधनाकडे वळण्याची गती फारशी उत्साहवर्धक असल्याची दिसून येत नाही. असे त्यांनी निष्कर्षात म्हटले आहे.

**एम. एस. महेंद्रकुमार (२०१९)**, यांच्या Impact of Pradhan Mantri Ujjwala Yojana on the Forest Dwelling Tribes of Kannur District in Kerala प्रस्तुत शोधनिबंधात केरळमधील कन्नूर जिल्ह्यातील कन्नम रिझर्व फॉरेस्टमध्ये राहणाऱ्या आदिवासींवर प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा परिणाम व त्यांच्या आर्थिक उपक्रमांचे विश्लेषन करण्याचा प्रयत्न करतो. योजनेद्वारे त्यांना एक सिलिंडर मिळाला आहे, सिलिंडर संपल्यानंतर एक किंवा दोन दिवसात त्वरीत रिफिल सिलिंडर मिळणे कठिण जात असल्याचे दिसून आले. म्हणूनच, सध्याच्या अभ्यासानुसार असे सुचविण्यात आले आहे की, खरोखरच स्त्रियांच्या आरोग्याच्या समस्येचा विचार केला असेल तर या योजनेद्वारे त्यांना अनुदानित किमंतीत किंवा विनामूल्य आणखी एक सिलेंडर दिले जावे असे त्यांनी निष्कर्षात म्हटले आहे.

**यदूविर यादव, प्रदिप शर्मा, किरण राज (२०२०)**, यांनी Women Empowerment through Pradhan Mantri Ujjwala Yojana (PMUY) Scheme in Rajasthan: A Study on Rural Households in Selected Region या शोधनिबंधात पीएमयूवाय योजनेच्या परिणामी भारतातील ग्रामीण भागातील महिलांच्या सामाजिक–आर्थीक स्थितीवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषन करण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याद्वारे ग्रामीण क्षेत्रातील महिला सशक्तीकरणावर योजनेच्या प्रभावीपणाचे मुल्यमापन केले असता असा निष्कर्ष काढला की, एलपीजीचा मोठ्या प्रमाणात सक्षम वापर करणे, विशेषत: त्याचा सातत्यपुर्ण वापराच्या बाबतीत एलपीजीच्या फायद्यांविषयी आणि पारंपारीक इंधनाचे तोटे याबद्दल घरगुती जागरूकता वाढविण्यावर भर देला पाहिजे. असे त्यांनी निष्कर्षात म्हटले आहे.

**तथ्यांचे वर्गीकरण आणि विश्लेषण:**

**तक्ता क्र. १ लाभार्थ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती**

| घटक | | लाभार्थी संख्या—२०० | टक्के |
|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | एससी | ५७ | २८.५ |
| | एसटी | ४८ | २४ |
| | ओबीसी | ९५ | ४७.५ |
| **शिक्षण स्तर** | अशिक्षीत | ४५ | २२.५ |
| | प्राथमिक, उच्च प्राथमिक | ३२ | १६ |
| | माध्यमिक | ६५ | ३२.५ |
| | उच्च माध्यमिक | ४३ | २१.५ |
| | पदवी, पदव्युत्तर | १५ | ७.५० |
| **घराचा प्रकार** | पक्के | ७५ | ३७.५ |
| | अर्धपक्के | ९५ | ४७.५ |
| | कच्चे | ३० | १५ |
| **उत्पन्न** | २५,००० पेक्षा कमी | २९ | १४.५ |
| | २५,००० ते ३५,००० | १०५ | ५२.५ |
| | ३५,००० ते ४५,००० | ५० | २५ |
| | ४५,००० पेक्षा जास्त | १६ | ८ |
| **उत्पन्नाचे स्त्रोत** | शेती | ९९ | ४९.५ |
| | स्वत:चा व्यवसाय | ३० | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | रोज मजूरी | ७१ | ३५.५ |

**१. सामाजिक आणि आर्थिक स्थिती**

प्रतिसादकर्त्यांना त्यांच्या सामाजिक–आर्थिक व सामान्य पातळीविषयी विचारणा करण्यात आली, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती, राहणीमान, आरोग्य आणि अन्न सुरक्षा स्थिती प्रभावीत होते. आकडेवारीनुसार (तक्ता क्र. १) बहुतेक उत्तरदाते अनुसूचित जाती/जमाती व इतर मागास प्रवर्गातील होते ज्यात इतर मागास प्रवर्गाचे प्रमाण (४७.५%) अधिक होते. बहुसंख्य प्रतिसादकर्ते साक्षर होते (८४%) त्यात माध्यमिक शिक्षण (३२.५%) घेणारे सर्वाधिक होते. उत्तरदात्यांचे घर हे पक्के (३७.५%) व अर्धपक्के (४७.५%) व कच्चे (१५%) असल्याचे आढळून आले व मुख्य घरगुती व्यवसाय शेती (४९.५%) व शेतमजूरी (३५.५%) होते व त्यांचे सर्वाधिक वार्षिक उत्पन्न २५,००० ते ३५,००० दरम्यान असल्याचे लक्षात येते.

**तक्ता क्र २ जळावू लाकडाच्या आगीचे परिणाम**

| | लाभार्थी संख्या–२०० | टक्के |
|---|---|---|
| परिणाम होतो | ११२ | ५६ |
| होत नाही | ११ | ५.५ |
| माहित नाही | ७७ | ३८.५ |

**आरोग्याशीसंबधीत जागरूकता:**

आकडेवारीनुसार (तक्ता क्र. २) आरोग्याशी संबंधीत जागरूकतेबाबत महिलांशी चर्चा केली असता असे निदर्शनास आले की, बायोमास इंधनाच्या जळणापासून निर्माण होणाऱ्या धुरामुळे बहूतांश महिलांना (५६%) त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची जाणीव होती. जसे की, चिडचिड, डोळ्यांमध्ये जळजळ होणे, खोकला आणि छातीचे आजार होत असल्याचे त्यांनी सांगितले. तर काही महिलांना (३८.५%) बायोमास इंधनापासून होणाऱ्या परिणामांची काहीही कल्पना नव्हती. जळावू इंधनाचा लहान मुलांना होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल विचारले असता बहूतेकांना काहीच माहित नव्हते.

**२. चंद्रपूर जिल्ह्यातील इंधनाची स्थिती:**

**तक्ता क्र ३ चंद्रपूर जिल्हयातील इंधन वापर**

| | लाभार्थी संख्या–२०० | टक्के |
|---|---|---|
| केवळ एपीजी गॅस | ४५ | २२.५ |
| एलपीजी सोबत इतर इंधन | १३३ | ६६.५ |
| इतर इंधन | २२ | ११ |

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रतिसाद कर्त्यांच्या आकडेवारीनुसार (तक्ता क्र. ३) असं दिसतं की, उज्ज्वला योजनेच्या माध्यमातुन एपीजीचे मोठ्या प्रमाणात वाटप झाले असताना सुध्दा स्वयंपाकाकरिता केवळ एलपीजी गॅसचा वापर २२.५% आहे. गॅस सोबत इतर इंधन वापर करणाऱ्या महिलांचे (६६.५%) प्रमाण सर्वाधिक आहे. घरात गॅस असताना सुध्दा कधी कधी स्वयंपाकाकरिता महिला इतर इंधनाचा (११%) वापर करतात. एलपीजी व्यतिरिक्त इतर इंधन का वापरता? यावर त्यांची प्रतिक्रिया अशी होती की, सिलेंडरचे दर खुप महागले आहेत आणि त्यावर सबसिडी पण मिळत नाही. सिलेंडर जास्त दिवस पुरावा याकरिता इतर इंधनाचा वापर करतो.

**निष्कर्ष व उपाय:**

आमचे विश्लेषन असे दर्शविते की, केंद्र शासनाने उज्ज्वला योजनेच्या माध्यमातुन गरीब कुटुंबाना एलपीजी पुरविण्याचे स्विकारलेले धोरण अतिशय प्रभावी आहे. परंतु पीएमयूवाय सारख्या योजनेचे उद्दिष्ट तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा कुटुंबाना पूरविलेले एपीजी कनेक्शन हे सातत्यपुर्ण वापरात येईल. परंतु प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही, यामागील अडथळे म्हणजे एलपीजी रिफीलची दिवसेंदिवस वाढणारी उच्च किंमत, सबसिडीची अनियमितता व स्वस्त दरात व मोफत उपलब्ध असणारे विविध इंधन होय.

एलपीजी कनेक्शनचे शाश्वत वापरामध्ये रूपांतर करण्यासाठी शासनाने अडथळ्यांवर मात करून त्यावर उपाय योजावे लागतील. ज्यामध्ये सबसिडीमध्ये वाढ करणे, जनजागृती मोहीम राबविणे, एलपीजी वापरण्याच्या वर्तणुकिचा हेतू मजबूत करणे आणि एलपीजी वापरण्याचे आरोग्यदायी फायदे लोकांच्या मनात बिंबविने आवश्यक आहे.

**अभ्यासाच्या मर्यादा :**

१. सध्याच्या अभ्यासाचा उद्देश केवळ उज्ज्वला योजनेचा महिलांच्या आरोग्यावरील प्रभाव तपासने हा आहे, परंतु इतर घटक देखील पीएमयूवायच्या परिणामांवर प्रभाव पाडु शकतात.
२. सध्याच्या अभ्यासात चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या २०० महिला लाभार्थींचा नमुना घेण्यात आला आहे. त्यामुळे उज्ज्वला योजनेचा मोठ्या तथ्यांसह व्यापक संशोधन करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची :**

१. **आनंद विवेक (२०१८),** Two Years of Ujjwala Yojana: Dalits in Western U.P. land benefits resentment against centre on other issues. First Post (28 May 2018).
२. **जाधव मयुरा (२०१९),** ''गेम चेन्जर' उज्ज्वला' 'साद' वार्षिकांक, वर्ष : २ महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई ( जानेवारी २०१९)
**३. जयस्वाल वैशाली भोले, मेश्राम प्रविन (२०१९),** Are We Really Out of Chulha Trap: A Case Study from a District of Maharashtra, international Journal of Health & Research ISSN: 2249-9571 Vol. 9; Issue Jully 2019.
४. **महेंद्रकुमार एम. एस. (२०१९)**, Impact of Pradhan Mantri Ujjwala Yojana on the Forest Dwelling Tribes of Kannur District in Kerala, International of Management studies ISSN 2249-0302 Val. 6, Special Issue 5 June 2019.
५. **यादव यदूविर, शर्मा प्रदिप, राज किरण (२०२०)**, Women Empowerment through Pradhan Mantri Ujjwala Yojana (PMUY) Scheme in Rajasthan: A Study on Rural Households in Selected Region, Australian Journal of management, Forthcoming, Indian institute of Management Udaypur research Series. May 20, 2020
६. https://www.india.gov.in/spotlight/pradhan-mantri-ujjwala-yojana
७. www.orfonline.org/hindi/research

# माझा प्रवास (1857 च्या बंडची हकीकत सांगणारे) प्रवास वर्णन

**संजय जनार्दन आगलावे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर जि. अमरावती

**प्रस्तावना**
माझा प्रवास हे मराठीतील 1857 च्या बंडाची हकीगत सांगणारे वैशिष्टपूर्ण पुस्तक आहे. या बंडामध्ये गोडसे भटजी उत्तरेकडे तीर्थयात्रा करण्यासाठी व द्रव्यार्जन करण्यासाठी निघाले व दुदैवाने ते या बंडात अडकले, त्यांना अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले. यातून सुखरुप घरी परतल्यावर त्यांनी सुमारे 25 वर्षानंतर हे सर्व अनुभव लिहून ठेवले. त्यांचा जन्म 1827 मधील आहे त्यांचे गांव वरसई हे अलिबाग जिल्ह्यातील पेण या तालुक्यात आहे, ते ऋग्वेदी शांडिल्य गोत्री ब्राह्मण होते. त्यांच्या घरी अतिशय दारिद्रय होते. उपजिवेकेचे कोणतेही साधन नव्हते, ग्वालेरातील बायजाबाई शिंदे या मथुरेला यज्ञ करणार असल्याचे त्यांना कळले होते. या यज्ञात आपण सामिल होवून जे द्रव्य मिळेल त्यातून आपली परिस्थिती चांगली होण्यास हातभार लागेल असे त्यांना वाटत होते वडिलांनी सुरूवातीला उत्तरेकडे जगण्यासाठी विरोध केला पण सर्वांनी वडिलांची समजुत काढली व उत्तरेस जाण्यास निघाले गोडसे हे भिक्षुक होते पण त्यांच्या ठिकाणी चांगली अवलोकन शक्ती होती प्रसंगाचे चांगले वर्णन करण्याची क्षमता होती.

त्यांना आलेले अनुभव अतिशय मार्मिक पद्धतीने मांडले आहे त्यांच्या प्रवासवर्णनाचे स्वरूप एखाद्या बखटीसारखे आहे, या पुस्तकाचे सहा भाग आहेत पहिला भाग प्रस्तावनेचा आहे तो मुळ पुस्तकात नाही तो संपादकांनी योजलेला आहे यास पुस्तकात 1) प्रास्ताविक 2) वाघोलीहून पुढे 3) झाशीवालीचे बालपण 4) झाशी वर्णन 5) कल्पीच्या मार्गावर 6) बिलासियात तुला पुरूष दान 7) गंगेची कावड 13 पानाच्या प्रस्ताविकेत गोडसे भटजींच्या कुटूंबाची समग्र माहिती आलेली आहे यामध्ये त्यांनी देशाटन कशासाठी केले, नियतीवर त्यांचा विश्वास आहे, एकत्र कुटूंब पद्धतीतील भावंडाचे एकमेकावर असलेले प्रेम तसेच वडिलधाज्या मंडळीवर असलेली श्रद्धा त्यांच्या शब्दाला असलेली किंमत तसेच सासु सुना दिर भावजया यांच्यातील वाद वडिल व चुलत्यांचे वेगळे होणे त्यतुन निर्माण झालेली दारिद्रय, गोडसे यांनी शिक्षण झाल्यावर याज्ञिकाचा पेशा स्विकारला त्यानंतर त्यांचा विवाह झाला व इतर भावंडाचेही विवाह झाले त्यामुळे कर्जाचा बोझा वाढत गेला मध्यम वर्गीय ब्राह्मण कुटूंबातील दारिद्रयी कर्ज बाजारीपणा जीवनात चाललेली ओढताण यातून उपजीवेकेची सोय करण्यासाठी नाईलाजाने करावे लागणारे देशाटन कुटूंब प्रमुखाची काढावी लागलेली समजुत यासर्वांचे वर्णन त्यांनी सहजतेने केलेले आहे त्यामुळे हे प्रवास वर्णन अंत:करणापर्यंत पोहोचते. वाचकांला ते साद घालते तो या वर्णनात गुंतून जातो हा आपण केलेला प्रवास आहे हे जीवन आपण स्वत: अनुभवलेले आहे असे वाटते त्यांच्या संघर्षाशी आपली नाळ जोडली जाते, आपल्या प्रत्येकांचा पुर्वइतिहास जवळपास कुठल्यातरी गावापासून सुरू होते त्यामुळे आपल्या कुटंबाबद्दल लिहतांना आपल्या पर्वजांच्या गावाचा संदर्भ येणे स्वाभाविक आहे त्यायोगे आपली कौटुंबिक पार्श्वभूमी चांगल्या प्रकारे सांगु शकतो गोडसे भटजींनी आपल्या गावाचा सविस्तर खुलासा केलेला आहे त्यामुळे या वर्णनाला परिपुर्णता येते सगळे पुर्वसुत्र जुळत जातात वाचकांला कथा कालखंडाची जाणीव होते या वर्णनात समरसुन जातो. डोंगरकाठावरचे गावं गावातील शिवालय, ब्राह्मणवस्ती गोडसे यांच्या घराण्याची माहिती कुटूंबातील माणसे त्यांचे आपसातील संबंध वडिलांची ओळख श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे कडे वडील सरदार विचुंरकर यांचे पदरी ते नर्मदा गंगेपर्यंत गेलेले

पण प्रकृती बरी राहत नसल्यामुळे वसई येथे राहू लागले स्नान संध्या इत्यादीमध्ये मग्न असत, नंतर घराण्यामध्ये विभागणी झाली यामध्ये घरातील वाद इत्यादीचे संदर्भ आले आहे. पुढे यज्ञकर्मासाठी ते वाघोलीहून पुढे निघाले महुच्या छावणीनजीक लष्करातील पलटणीचे ोन शिपाई त्यांना भेटले त्यांच्याकडून काडतूसाचे प्रकरण त्यांना समजले, पुढे गेल्यावर 10 जुन ही बंडाची तारीख आहे याची माहिती त्यांना मिळाली ग्वाल्हेरला यज्ञासाठी निघालेले सर्व भिक्षूक मंडळी या गदारोळात सापडली पण काळे सैनिक धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे त्यांना मदत झाली त्यांना दानधर्माचे प्रसंग स्वत: पाहण्याची संधी मिळाली वाघोली ते ग्वाल्हेरपर्यंत मुकामात गोडसे यांनी त्यांना भेटलेले शिपाइ त्यांच्या सोबतीने केलेला प्रवास वर्णन केले आहे. त्यांची वृत्ती प्रत्येक गोष्टीचे रसपूर्ण वर्णन करण्याची आहे.

झाशीवालीचे बालपण या प्रकरणात नानासाहेब पेशवे यांनी कानपुरच्या लढाईत शौर्य गाजवून त्यास कसे परतावे लागले इंग्रजांनी ब्रह्मवतीवर कसा हल्ला केला आणि शहराची कशी लुट केली यासोबतच गोडसे भटजींनी आपण झाशीस कसे येऊन पोहचलो याचा वृत्तांतही दिला आहे लक्ष्मीबाईचे लग्न झाशीच्या राजघराण्यात झाले याबाबतचा वृतांत यामध्ये ओलला आहे दरमजल करित गोडसे भटजी यांच्या काकाआदी सोबत झाशीला पोहचले तेथे केशव भटजी मांडगवडे हे ऋग्वेदी व प्रतिष्ठीत भट होते त्यांच्या घरी राहण्याचीसंधी त्यांनी यांना दिली व तेथील माहिती त्यांनी मिळवली हा त्यांच्या प्रवासाचा वृत्तांत आला आहे या व्यतिरिक्त जो वृत्तांत आलेला आहे तो उत्तर हिंदुस्थानात जे बंड घडले होते त्याच्या संदर्भातील आहे. झाशीचे वर्णन प्रकरणात ते झाशीला कसे गेले झाशीच्या राणीशी त्यांची कशी भेट झाली, झाशी वर झालेली चाल अकरा दिवस चाललेल युद्ध या युद्धादरम्यान झालेल्या फितुरीचे वर्णन आलेले आहे. इंग्रजांनी झाशीवर आक्रमण करण्याची तयारी केली बाईसाहेबांनी संपूर्ण तयारी केली विजय आपलाच होईल असे राणीला वाटत होते उद्या सकाळपासून लढाईचा आरंभ होणार असे कळले लढाईला सु ूरवात झाली दोनचार बॉंब गोळे येऊन पडले झाशीच्या दक्षिण बाजुला लुदाजीसिंह परदेशी लढत होता इंग्रज मजुरांच्या कडून गवताचे भारे रचुन जिना करून तटावर येत होते त्यावेळी राणीसाहेबाचा पाऊणशे वर्षाचा सरदार बाहेर आला बंदुकीच्या गोळीने मरणे आणि रांड मारणे सारखेच, गोर लोक शहरात लुटपाट करू लागले लोकांची कत्तल करू लगाले लोकांचे पैसे लुटु लागले, या सर्वांत दुलाजीसिंह परदेशी याने फितुरी केल्यामुळे इंग्रजांना विजय मिळवला पण इंग्रजांनी अशा घोकेबाज माणसाची गय केली नाही त्यामुळे त्याला व त्याच्या भावाल गोज्या साहेबांनी बंदुकीच्या गोळीने उडवले ही सर्व हकीकत गोडसे भटजी यांनी लिहीली आहे.

यामागील पार्श्वभूमी सांगतांन ते म्हणता द्राविड- रामेश्वराकडील एक ब्राह्मण दोन भोषेत निपुण होता तो महाराष्ट्रातील भाषेत निपुण होत तो स्वत:ला शाक्त म्हणवत असे जो कपाहावर पिंजरेचा टिक्का लावी तो ब्राह्मण झाशीला आला तो इंग्रजांशि हेरगिरी करण्याकरीता पाठवला होता त्याने दुलाजीसिंह या राज्यातील फितुराला त्याने हेरले त्याला फितुर करून संपूर्ण संस्थान त्यांने बुडविले व झाशी हस्तगत केली, इकडे राणीसाहेबांनी किल्ल्याचा दरवाजा बंद करून सर्व दारूगोळा उडवून मरण पत्करावे म्हाताज्या सरदारने असे करण्यापासून त्यांना परावृत्त केले रात्र होताच सर्व तयारी करून प्रसंगी युक्ती करून बाहेर पडावे एकंदर झाशीतील संग्रामाचे फितुरीचे वर्णन गोडसे भटजींने केले आहे त्यावेळच्या एकूण परिस्थितीचे एकंदर समाजजीवन इत्यादीचे प्रत्यक्षदर्शी वर्णन फार कमी उपलब्ध आहे त्यामुळे माझा प्रवास या आत्मवृत्ताला महत्व आहे. झाशीचे वर्णन या प्रकरणात ते झाशीला कसे गेले झाशीच्या राणीची त्यांची कशी भेट झाली झाशीवर झालेली चाल अकरा दिवस चाललेल युद्ध, फितुरीमुळे

झाशी राणीला आशया निरूपाय मोरोपंत तांबे यांना दिला गेलेली फाशी या सर्वांचे वृत्त आलेले आहे. गोडसे यांची वृत्ती चिकित्सक आणि रसिक होती त्यांनी केलेले शहराचे वर्णन शहरातची वस्ती, हलवाईपुरा, कोष्टीपुरा या शहरातील रीतभात, शहरातील लोककसबी हुशार सावकारी व्यवहार कसोशीने पाळणारे गालिचे, वस्ते पितळी उपकरणे इत्यादी वस्तु हे तयार होत शहरातील वाडे कौलारू शहराच्या दक्षिण दावाज्याबाहेर मोठा तलाव तलावाच्या दक्षिण बाजुस महालक्ष्मी देवालय ही देवी झाशीवाल्याची कुलदैवत भरपूर खर्च करून बांधलेले हे देवालय याजवळ धर्मशाळा आणि काही इतराची बांधलेल्या शहरात गणपती, विष्णु, शिव देवी हनुमंत वगैरे देवाची देवालये होती.

काल्पीच्या मार्गावर या प्रकरणात त्यांनी काल्पी शहर पाच सहा कोस दुर असतांना एका लहान खेडे गावात त्यांनी मुक्काम केला, काल्पी दोन किलोमिटर असतांना एका विहरीजवळ पाणी पिण्यासाठीजात असतांना त्यांना पठाणाच्या पोषाखात झाशीच्या राणीचे दर्शन घडवले त्यांनी स्वत: विहीरीचे पाणी काढले व ती त्यांच्या बाजुला येवुन बसली धर्मरक्षा करण्यासाठी आपण युद्ध करण्यासाठी प्रवृत्त झालो पण यश मिळाले नाही काल्पी शहर लहान टुमदार यमुनेच्या काठी किल्ला होता शहरात साखरेचा व्यापार होता, तेथे श्रीमंत रावसाहेब पेशवे व तात्या टोपे होते त्यांनी सांगितले यमुनेतून उतरून जाण्याचा रस्ता नाही इंग्रज सरकारचा पक्का बंदोबस्त तेथे होता, लढाई लवकरच सुरू होण्याची स्थिती निर्माण झाली होती अशाही परिस्थितीत राणीने गोडसे यांना खर्चासाठी काही रूपये दिले इत्यादी वर्णन त्यांनी केले आहे. ग्रंथाच्या शेवटी गंगेची कावड या प्रकरणामध्ये काशीयात्रा करून त्यांनी यात्रेची पुर्णता आणली आपल्या पित्याबद्दल अपार श्रद्धा त्यांच्या ठिकाणी दिसते गंगेचे पाणी घरी आणून आपल्या माता पित्यांना स्नाने घातली घरी आल्यावर अप्तांची त्यांनी भेट घेतली व मांवंद केले माझा प्रवास हे अतिशय वाचनिय आणि रोमहर्षक झालेले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. माझा प्रवास - लेखक विष्णुभट गोडसे वरसईकर संपादक : मृणालिनी शहा

# महाराष्ट्रीतील मृदाधूप आणि संवर्धन

**डॉ. प्रा. कलंदर मुस्तफा पठाण**
कला विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर गढी ता. गेवराई जि. बीड
**Email :- pathankm2014@gmail.com**

निसर्ग हा जीवन निर्मितीचा महत्वाचा भाग आहे. या निसर्गमय वातावरणात सर्व सजीवांचा जीवन विकास झालेले आहे. या साठी सर्वात महत्वाचा घटक म्हणजे माती (मृदा) होय. अनेक संसोधनावरुन असे आढळुन आले आहे. कि नैसर्गिक व मानव निर्मित कारणामुळे मृदेची धूप मोठ्या प्रमाणात होते सरासरी मृदा धुपेचे प्रमाण दर वर्षी हेक्टरी 125 ते 300 टना पर्यंत झालेले आढळते अशी अमर्यादित व अनिर्बंध धूप होत राहिल्यास अनेक समस्यांना मानवी समाजाला तोड द्यावे लागेल यातुन मानवी जीवन हे संकाटात सापडल्या शिवाय राहणार नाही. अशा प्रकारच्या धुपेमुळे अवर्षणग्रस्त भागात आवर्षणाचे प्रमाण वाढत असुन नद्या नाल्याची पात्रे गाळाने भरल्यामुळे मोठमोठ्या पुरामुळे आर्थिक व जिवित हानीचे प्रमाण दिवसे दिवस वाढू लागले आहे. 1 सें.मी. मातीचा स्तर तयार होण्यासाठी जवळ जवळ 400 ते 1000 हजार वर्षाचा कालावधी लागतो. परंतु या 1 से.मी. जाडीच्या मृदेचा ऱ्हास किंवा धूप होण्यासाठी अतिशय अल्पकाळ लागतो त्यामुळे निसर्गामध्ये सर्वात महत्त्वाचा घटन महणजे मृदा ( माती ) याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

**प्रस्तावना**

भारतामध्ये या कामाची सुरुवात पहिल्या पंचवार्षीक योजनेच्या काळात टप्या टप्याने करण्याचे लक्ष् ठरविण्यात आले. त्याची अंमल बजावणी दुस-या व तिस-या पंचवार्षिक योजनेमध्ये उदिष्ट ठरवुन करण्यात आले. हे उदिष्ट 60 लाख हेक्टर होते.

महाराष्ट्रा मध्ये मृदा संधारणाचा कायदा 1942 मध्ये तयार करण्यात आला व 1948 च्या पुरवणी कायद्याने प्रत्येक जिल्ह्यासाठी भूसुधारणा मंडळे कायम करण्यात आली या भुसुधारण मंडळामुळे महाराष्ट्रात मृदा संधारणाच्या कामाची सुरुवात झपाट्याने झाली कारण् या योजनेस शेतक-यांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळाला. याच काळात शेतक-यांनी देखिल स्वता:च्या अनुभवाचा व अवगत तंत्रा व्दारे मृदेचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला.

**उदिष्टये :-** मृदा धुपेच्या करणांचा अभ्यास करणे.

1. मदा धुपेच्या प्रकाराचा अभ्यास करणे.
2. मृदा धुपेचा शेती क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन विधान :-** महाराष्ट्रातील मृदाधूप व संवर्धन

**संशोधन पध्दती :-** सदर शोधानिबंधा करिता दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. यात विविध शासकीय अहवाल संदर्भ ग्रंथ इत्यादीचा वापर विश्लेषणासाठी केला आहे.

**गृहितके :-** मृदेची धूप झालेली आहे.

1. मृदा धुप कृषी (शेती) विषयक समस्या निर्माण झालेल्या आहे.
2. पडीत जमीनीचे प्रमाण वाढले आहे.
3. मृदा संधारणासाठी केलेल्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.

**अभ्यास क्षेत्र :-** सदर शोधनिबंधासाठी महाराष्ट्र राज्यातील मृदेची धूप आणि संधारण हा विषय शोध निबंधासाठी निवडण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्र राज्याचे स्थान व विस्तार :-**

महाराष्ट्राच्या अक्षवृत्तिय विस्तार 15.45 उत्तर ते 26.6 उत्तर अक्षांश महाराष्टाचा अक्षयवत्तीय व रेखा वृत्तीय विस्तार 72.6 पुर्व ते 80.89 पुर्व रेखांश या दरम्यान आहे. या राज्याची दक्षिण उत्तर लांबी 720km. व पुर्व – पश्चिम लांबी 800 km. आहे. तर क्षेत्रफळ 3,07,710 आहे. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 11,23,72333 आहे. तर लोकसंख्येची घनता 365 आहे. भारतामध्ये महाराष्ट्राचा लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्यात एकुण 36 जिल्हे असुन त्याची विभागणी सहा प्रशाकीय विभागामध्ये केलेली आहे.

प्राणी वनस्पती यांची हालचाल पावसाचे पाणी यांच्या परिणामामुळे भूपृष्ठावरील मातीचे कण एकमेकांपासुन वेगळे होतात असे वेगळे झालेले मातीचे कण वारा पावसाचे वाहणारे पाणी यांच्याबरोबर वाहुन जातात यामुळे मृदेची धूप होते. भू पृष्ठावरील मातीचे कण एका जागेवरुन दुस-या जागेवर स्थालांतरीत होते म्हणजेच मृदेची धूप होय धुपेची प्रक्रिया ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. खडका पासुन,ऊन, पाऊस, वारा, थंडी, उष्णता, इत्यादी घटकामुळे विदार प्रकियामुळे माती तयार होते 1cm मातीचा थर तयार

होण्यासाठी अनेक वर्ष लागतात त्याच बरोबर झाडे झुडप, गवत, पालापाचोळा यांच्यावर सुक्ष्म जीवाव्दारे प्रकिया होऊन त्यापासुन देखिल मृदा तयार होते या मृदे मध्ये अनेक पोषक घटकांचा समावेश होऊन त्या पासुन उपयुक्त मृदा तयार होते.

**मृदे मध्ये खालील प्रमाणे घटक आढळतात.**

**मृदेतील सुपीक घटक :-**

| अनु. | सुपीक घटक | प्रमाण |
|---|---|---|
| **1.** | **हवा** | **25%** |
| **2.** | **जल** | **25%** |
| **3.** | **सेंद्रीय घटक** | **5%** |
| **4.** | **खनिजे** | **45%** |
| **5.** | **एकुण** | **100%** |

**मृदेची सूपीकता :-**

पिकांची चांगली वाढ होण्या करिता मृदेची सुपीकता हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. मृदेची सूपीकता ही सामू (PH) काढुन मोजली जाते. सामू हे मातीचे तुलानात्मक आम्ला, विम्लता दर्शविणारे परिणाम आहे. जर जमीनीचा सामू 7 असेल तर ती मृदा / जमीन उदासीन असते जमिनीचा सामू 7 पेक्षा अधिक असल्यास मृदा ही विम्ल (Alkline) असते व जमिनीचा सामू 7 पेक्षा कमी असेल तर ती जमीन अम्लधीर्मय Acidic असते. जमिनीचा सामू 6.5 ते 7.5 या दरम्यान असल्यास पिकांचा वाढीसाठी आवश्यक असणारे सर्व मुळ घटक उपलब्ध असतात अशी मृदा पीकांच्या वाढीसाठी उपयुक्त असते. परंतु मनुष्य व पाणी यांचा हस्तक्षेप वाढल्याने मातीचे कणा मोठ्या प्रमाणात विलग होतात तसेच शेती साठी वेगवेगळ्या प्रकारची मशागत केल्याने मातीची उलथापालथ होऊन ती विसकळीत होते. ही विसकळीत झालेली मृदा ऊन,वारा, पर्जन्य इत्यादी वाह्य कारकामुळे होणा-या धुपेला गतिवृध्दीत धूप असे म्हणतात ही धूप अपाय कारक असते. आधुनिक काळामध्ये यांत्रिक युगाचा उदय हा मानवी जीवनाच्या विकासासाठी नवीन नविन तंत्रज्ञानाचा वाढता वापर हा मृदा धुपेसाठी महत्वाचे कारण बनले आहे. मानवाच्या वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड करुन ती जमिन लागवडी खाली आणल्या मुळे मृदे वरिल नैसर्गिक आवरण दूर करण्यात आली त्यामुळे देखिल मोठ्या प्रमाणात मृदेची धूप होऊ लागली.

**मृदा धुपीचे प्रकार :-**मृदा धूपेचे खालील काही धूपेच्या प्रकारा वरुन वर्गिकरण केलेले आहे.

1. **उसळी धूप :-** जेव्हा पावसाच्या पाण्याचे थेंब जमिनीवर पडते तेव्हा त्यात असलेल्या प्रचंड गती मुळे मातीचे कण वेगळे होतात परिणामी त्या ठिकाणी खड्डा पडतो व मृदा विखुरली जाते हा प्रकार साधा वाटत असेल तरी धूपेची खरी सुरुवात येथुनच होते.
2. **ओघळी धूप :-** ज्यावेळेस पावसाच्या पाण्याचे अनेक थेंब जमा होऊन ते उताराच्या दिशेने वाहू लागतात,ते आपल्या सोबत वेगळे झालेले मातीचे कण वाहून नेतात या प्रवाहाच्या जागेवर लहान लहान ओघळी तयार होतात त्याला ओघळी धूप असे म्हणतात हा धूपेचा दुसरा टप्पा आहे.
3. **चादरी धूप :-** जेव्हा असंख्या लहान – लहान ओघळी एकत्र येतात तेव्हा जमिनीचा एक विशिष्ट पृष्ठ भाग पाण्या बरोबर वाहून जातो याला चादरी धूप असे म्हणतात.
4. **घडी धूप :-** ज्या वेळेस दीर्घ कालावधीसाठी पाण्याचा प्रवाह वाहत असतो त्यावेळेस प्रवाहाच्या तळाची झपाट्याने झीज होऊ लागते व लहान लहान प्रवाहाचे रुपांतर नाला, वडा, व नदी मध्ये होऊ लागते याला घडी धूप असे म्हणतात.

**मृदच्या धुपीमुळे जमिनीच्या गुणधर्मावर होणारे दुष्परिणाम**

| अनु. | जमीनीचे गुणधर्म | धूप न झालेली जमिन | | थोड्या प्रमाणात धूप झालेली जमिन | | जादा प्रमाणात धूप झालेली जमीन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र | कर्नाटक | महाराष्ट्र | कर्नाटक | महाराष्ट्र | कर्नाटक |
| 1. | चिकल मातीचे प्रमाण % | 43% | 62% | 43% | 52% | 27% | 44% |
| 2. | अधिशोषिक कॅलीश्यम प्रमाण % | 56% | 50% | 49% | 43% | 25% | 44% |
| 3. | सर्वोच्च जलधारण क्षमता प्रमाण % | 71% | 70% | 71% | 66% | 55% | 56% |

**महाराष्ट्रातील मृदा धुपेची कारणे :-**

**1) जमिनीचा उतार :-**

महाराष्ट्राच्या पठारी भागात मंद उतार व सह्याद्री सातपुडा पर्वतीय प्रदेशात तिव्र उतारा मुळे मोठ्या प्रमाणात मृंदेची धूप होते.

**2.पावसाचे प्रमाण :-**

मृदेचा आकार रंग व पाणी साठवण्याची क्षमता याच्यावर मृदा धूप अवलंबून असते काळया मृदेची धूप कमी प्रमाणात होत तर तांबडी , जांभी मृदेत पाण्याचा निचरा जल्द गतीने होत असल्या मुळे धूप मोठ्या प्रमाणात होते.

**3. वृक्ष तोड :-**

वनअच्छादीत प्रदेशावर वृक्षतोड मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे त्या प्रदेशात मृदेची झीज झालेली आहे. तसेच चराऊ कुरणे इत्यादी अतिवापारामुळे ह्या ठिकाणी देखिल मृदेची झीज होते.

**मृदा संधारण उपाययोजना :-**

उत्पादित शेतीच्या एकुण प्रमाण पैकी सुमारे 49% क्षेत्र धुपेच्या विळख्यात सापडलेल्या आहे याचे प्रमाण कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मृदा संधारण विभागाची स्थापना केलेली आहे. या विभागातील मृदा संधारणासाठी खालील उपाययोजना सांगितलेली आहे.

1. **वृक्ष लागवडीचे प्रमाण वाढवणे .**
2. **पिकांची फेर पालट करणे.**
3. **शेतीला बांध वंधिस्ती करणे.**
4. **तीव्र उताराच्या ठिकाणी पाय-याची शेती करणे**

महाराष्ट्र राज्याकडे एकुण 30 लाख हेक्टर जमीन असून त्यापैकी 173.68 लाख हेक्टर जमीनीवर प्रत्येक्ष पीके घेतली जातात. म्हणजेच उर्वरीत जमीन ही बिगर कृषी वापरली आहे त्यामुळे उपल्बध जमीनीचा वापर करण्याच्या दृष्टीकोनातुन जमिनीची धूप मर्यादीत ठेवणे गरजेचे आहे.यासाठी प्रदेशानुसार कृषि व जल, वायू यांची कार्यक्षमता तसेच जमिनीचा उतार, उंच सखलपणा, मृदेची खोली धुपीचे प्रकार व तीव्रता जमीनीची कार्यक्षमता इ. बाबींचा विचार करुन व नविन आधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करुन मृदा संधारण करणे गरजेचे आहे.

**मृदा संधारणचा कृषी क्षेत्रातील परिणामी :-**

आजच्या काळामध्ये मृदा संधारण किंवा मृंदेचे संवर्धन कृषी क्षेत्रासाठी महत्वाची बाब बनली आहे. शेतीचा विकास करायचा असेल तर मृदा व जल संवर्धन करणे गरजचे आहे. मृदा संधारणामुळे पिकांच्या उत्पादनात 40 ते 50% पर्यंत वाढ होते. तसेच जमिनीची झीज थांबल्यामुळे लागवडी योग्य जमिनीचे प्रमाण वाढते, तसेच भुसंधारणामुळे भूजल पातळीत देखिल वाढ झालेली आढळुन येते. या सर्वोच्या कृषि क्षेत्रावर सकारात्मक परिणाम होऊन आर्थिक विकासाला पाठबळ मिळते.

**निकर्ष :-** मृदेची धूप नैसर्गिक किंवा मानव निर्मित कारणांने नेहमी होतच राहणार यात शंका नाही परंतु सजक व जागृक राहून मृदेच्या नुकसानीला आपण आळा घालू शकतो या मुळे पर्यावरणाचे देखिल संतुलन होईल. पर्यावरण व पर्यावरणातील इतर घटकांची देखिल उपलब्धता वाढेल यातुन मृदेची सूपिकता वाढुन पिकांचे उत्पन्न वाढेल, उत्पादन वाढल्यामुळे सामाजिक व आर्थिक विकास होण्यास मदत होईल तसेच मृदा संवर्धणा बरोबरच पावासाच्या पाण्याचे संवर्धन होऊन भूजल पातळी वाढेल भूजल पातळीत वाढझाल्यामुळे पाण्याची दुर्भिक्ष कमी होऊन दुष्काळ निवारणासाठी मदत होईल.

**सारांश :-** मानव विकसीत होत असतांना स्वता:ची उपजिवीका भागण्यासाठी सुमारे 7000 वर्षा पुर्वी शेतीकरण्यासा सुरुवात केली सुरुवातीच्या काळात झूम

प्रकारची शेतीची सुरुवात झाली यातुन मानवी गरजा पूर्ण होत होत्या परंतु कालातराने लोकसंख्या वाढीमुळे मानवी गरजांमध्ये वाढ होत गेली. वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मानवाने विस्तत्व स्वरुपात शेती करण्यास सुरूवात केली. यातुनच जमिनीवरील नैसर्गिक अच्छादनाचा –हास होऊन मृदा धूप मोठ्या प्रमाणात होऊ लागली त्यामुळे हाजारो वर्षांनी तयार झालेल्या जमिनीचे उच्चाटन होऊन ती नष्ट होऊ लागली महाराष्ट्र राज्यातील जमिनीच्या धूपीचे प्रमाण एकुण लागवडी खालील क्षेत्रा पैकी जवळ जवळ 2/3 क्षेत्र बाधित झाले आहे. याचे संर्वधण होणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1. डॉ. जयकुमार मगर, भारताचा भूगोल विद्या प्रकाशन नागपूर डिसेंबर 1990
2. राकेश कुमार वाटर शेड डेव्हेलप्मेंट, अध्ययन पब्लिकेशन न्यु दिल्ली 2019
3. महाराष्ट्र सिंचन विकास त्रैमासिक जुलै, ऑगस्ट, स्पटेबर 2019
4. लढा दुष्काळाशी, ॲग्रोवन कृषीज्ञान, सकाळ पेपर्स ,नोव्हेंबर 2013
5. रामचंद्र शंकरराव झगडे मृदगंध हिंद स्वराज्य ट्रस्ट राळेगण सिध्दी जानेवारी 2011

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December-2021, Volume-12, Issue-29

# भारतीय शेती व्यवसायावर हवामान बदलाचा होणारा परिणाम

**डॉ. दिलीप फोके**

भूगोल विभाग प्रमुख, गोदावरी कनिष्ठ व वरीष्ठ,कला महाविद्यालय, अंबड, ता.अंबड, जि.जालना.

**सारांश :** भारत हा जगातील सर्वाधिक ग्रीन हाऊस गॅसेस उत्सर्जीत करणारा सहावा देश म्हणून ओळखला जातो. देशातील वार्षिक सरासरी तापमान 1.1 ते 2.3 अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारताच्या ढोबळ राष्ट्रीय उत्पादनात जागतीक सरासरी पेक्षा मोठी घसरुन होईल. हवामान बदलामूळे पर्जन्यातही मोठ्या प्रमाणावर फेर बदल होतील. अवर्षण, महापूर, चक्रीवादळाची वारंवारता व तीव्रता वाढण्याची मोठ्या प्रमाणावर शक्यता आहे. तापमान वाढ व त्यामुळे होणाऱ्या परिणामाचा शेती उत्पादनावर परिणाम झालेला दिसून येतो. शेतीशिवाय पशुपालन, मत्सोउत्पादन व इतर संबंधीत घटकावर परिणाम झालेला दिसून येतो. 1981 ते 2020 या काळात तापमानात वाढ झालेली दिसून येते. भारतातील 60 टक्के कृषी पावसावर अवलंबून आहे. वाढत्या तापमानामुळे भारताच्या पश्चिम भागात पावसाचे प्रमाण वाढलेले आहे तर मध्य भागात कमी झोलेले आहे. तर भारतीय कृषी उत्पादनात घट होऊन अन्नधान्य उत्पादनाकरीता हवामान बदलही गंभीर समस्या बनली आहे.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आसून भारतीय अर्थव्यवस्थेचा कृषी हा कणा आहे. भारातील 70 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. वाढते तापमान, पावसाची अनिश्चितता, समुद्रपातळीत वाढ वादळे, हरितगृह परिणाम, विविध पिकावरील किड, नैसर्गिक अपात्तीचा कृषी क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होत आहे. अतिजलसिंचन, अतिरत्सायनीक खतांचा वापर यामुळे जमिनी क्षारयुक्त होऊन त्याचा पिक उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे. सध्या मानवाच्या वाढत्या क्रियामुळे वातावरण दूषित होत आहे. भारतात 19 व्या शतकात सरासरी 0.2 ते 0.6 से. ने तापमानात वाढ झालेली दिसून येते. या हवामान बदलाचा परिणाम पिके, पर्जन्य व मानवी आरोग्यावर होऊ लागला आहे. ओझोनचा क्षय मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होऊन मानवाला विविध आजार होत आहेत. सजीव सृष्टी व मानवाच्या दृष्टीने ही अतिशय गंभीर समस्याआहे. ओझोन क्षय असाच होत राहिल्यास तापमपानात वाढ होऊन ध्रुव प्रदेशातील बर्फ वितळुन सागराच्या पातळीत वाढ हाईल.

**परिवलीन शब्द :** हवामान बदल, कृषीउत्पादन, शाश्वत कृषी विकास,

**अभ्यास पद्धती :** सदर शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता मिळविण्यात आलेली माहिती हि दुय्यम स्त्रोतावर आधारीत आहे. शासकीय अहवाल, विविध संदर्भ ग्रथं, शासकीय कार्यालये, मासिके इ. आधार घेवून माहितीचे संकलन करुन सांख्यिकी विश्लेषण केले आहे.

**गृहितके:**

1. हवामान बदलाचा कृषी, क्षेत्रावर परिणाम झालेला आहे.
2. जलचक्राचे संतुलन बिघडले आहे.
3. वनस्पती व प्राणी जीवनावर विपरीत परिणाम झालेला आहे.
4. कृषी विषयक समस्या उद्भवलेल्या आहेत.

**उद्दिष्टे :**

1. हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम आभ्यासणे.
2. हवामान बदलामुळे होणारे समाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.
3. कृषीवर परिणाम करणाच्या घटकांचा अभ्यास करणे.
4. कृषी समस्यांचा अभ्यास करणे.

**अभ्यास क्षेत्र :**

सदर शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी भारतातील कृषीवर हवामानबदलाचा परिणाय या विषयी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात एकूण जमिनी पैकी 54 टक्के जनिम कृषी योग्य असून पैकी 46 टक्के प्रत्यक्ष लागवडी खाली आहे. एकूण जमिनीपैकी फक्त 35 टक्के जमिनिस जलसिंचनाच्या सुविधा आहेत. देशात सर्वत्र भूस्वरुप, मृदा, हवामान व भौगोलिक परिस्थिती भिन्न आहे भारतात 65 टक्के कृषी पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे कधी अवर्षण, दुष्काळ व अतिवृष्टी यामूळे भारतीय कृषी उत्पादनात चढउतार दिसून येतात. त्यामुळे त्याचे सामाजिक व आर्थिक

परिणाम दिसून येतात. याचा या शोधनिबंधातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**हवामान बदलास प्रभावीत करणारे घटक व कारणे**

हवामान बदलास नैसर्गिक घटकाबरोबर मानवनिर्मित घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. जागतिक तापमानवाढ, हरीतगृह वायुचे वाढते प्रमाण, ओझोनक्षय, जंगलांचा ऱ्हास, इंधनाचा अतिवापर, जमीन वापरातील बदलेल्या पद्धती, औद्योगिकरण, वाढते प्रदुषण या घटकामुळे हवामानात बदल होत आहेत.

**हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम :**

वाढते औद्योगिकरण, वाहनांची वाढती संख्या अणुचाचण्या, जंगलतोड या कारणामुळे वातावरणात प्रतिकूल बदल होत आहेत. हवा, जल ध्वनी, जमिन प्रदषण व तापमानवाढ, आझोन क्षय आम्लपर्जन्य, घनकचरा प्रदुषण, अनुअपघात इ. प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे हवामान बदल होऊन आर्थिक व सामाजिक परिणाम होत आहेत. हवामान बदलाचा जास्तपरिणाम कृषी क्षेत्रावर इ गोलेला दिसून येतो भारताचा आर्थिक विकास हा कृषीवर अवलंबून आहे. एलनिनो प्रभावामुळे भारतीय मोसमीपाऊस कमी पडतो त्यामूळे कृषी उत्पादनावर परिणाम होऊन उत्पादन कमी मिळते.

**नैसर्गिक आपत्ती व कृषी :**

हवामानातील बदलाचा पिकाखालील क्षेत्र व गुरांवरील परिणाम

| वर्ष | भारतातील खालील क्षेत्राचे नुकसान (लाख हे.) |
|---|---|
| 2011-12 | 47.13 |
| 2012-13 | 46.25 |
| 2013-2014 | 70.87 |
| 2014-15 | 35.87 |
| 2015-16 | 31.98 |
| 2016-17 | 60.10 |
| 2017-18 | 67.05 |
| 2018-19 | 80.11 |
| 2020-21 | 82.10 |

वरिल तक्त्यावरुन असे दिसुन येते की पूर, वादळे व भूस्खलनामुळे 2011 ते 2021 या वर्षापैकी 2017-18 या वर्षी पिकाखालील क्षेत्रात 67.05 लाख हे. क्षेत्र प्रभावीत झाले.

**भारतीय शेती व शाश्वत विकास :**

भारतासाठी चिंतेची बाब म्हणजे कृषीक्षेत्रावर तापमानातील बदल कमी किंवा जास्त देवून शेतीचा शाश्वत विकास करणे आवश्यक आहे. देशातील 32 ते 35 टक्के एवढी उत्सर्जन तीव्रता कमी करणे आवश्यक आहे. प्रदुषण मुख्यतः भूप्रदुषण कमी करणे आवश्यक आहे. गरीबीचे उच्च प्रमाण, लोकसंख्येची घनता, पर्यावरण ऱ्हास मोसमी पावसावरील शेती यामुळे भारत देश नाजुक स्थितीत आहे. आण्विक, सौर, पवन, बायोग्यास या उर्जाचा मोठ्या प्रमाणावर वापर आवश्यक आहे. पाण्याचे योग्य व्यवस्थापन व संवर्धन करणे आवश्यक आहे. तसेच प्रतिकूल परिस्थितीत तग धरणाऱ्या पिकांची लागवड करणे आवश्यक आहे शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे व कृषीपद्धतीत व्यापक बदल जसे ठिबकसिंचन, व कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची लागवड करणे.

**निष्कर्ष :** पृथ्वीच्या तापमानात सातत्याने वाढ होत आहे. क्लोरो फ्लयुरो कार्बन पातळी दरवर्षी 5 टक्के वाढत आहे स्थुल उत्पादनाचा विचार करता शेती घटकाचा वृद्धीदर मान्सून 7% कमी असताना 2% होता, मान्सुन 15% कमी असतांना (-2) 2% वृद्धीदर होता तर मान्सून 22% कमी असतांना (-)6% वृद्धीदर होता. भारत देशात वारंवार अवर्षण व दुष्काळ परिस्थिती उद्भवलेली दिसून येते. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान झालेले दिसून येते. अधिक पिकउत्पादन होण्याच्या हेतूने मानव अतिजलसिंचन अतिरासायनिक खतांचा, किटकनाशकाचा व तणनाशकांचा वापर करीत आहे. त्यामुळे क्षारयुक्त व पडीक जमीनीची समस्या उद्भवत आहे. त्यामुळे शेतीचा शाश्वत विकास करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**

1) डॉ. विठ्ठल घारपुरे, (2006)'भारताचा भूगोल', पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर
2) प्रा. के. ए.खतीब, (2005) 'भारताचा भूगोल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
3) प्रा.के.ए.व्ही. ढाके, प्रा.डॉ.एस.टी इंगले, प्रा.डॉ.व्ही.जे पाटील, (2004) 'पर्यावरणशास्त्र', प्रशांत पब्लिकेशन्स, पुणे.
4) Drousht (2002) States Report Govt. Of India, New Delhi
5) योजना मासिक, जून -2014, डिसेंबर-2015, जुलै-2012 मे-2012, जुलै-2016

6) महाराष्ट्र सिंचन विकास त्रैमासिक डिसेंबर 2017, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.
7) पांडुरंग कोळेकर, अरुण सवदी, मोहन जोशी, (2007) 'पर्यावरणीय अध्ययन' निराली प्रकाशन, पुणे.
8) डॉ. अरुण राजाराम कुंभारे (2003) 'कृषी भूगोल,' पायल पब्लिकेशन, पुणे.
9) कुरुक्षेत्र मासिक फेब्रुवारी 2017, सूचना व प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली.
10) www.downtoearth.org.in
11) www.omicsonline.org
12) www.cseindia.org

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,*
*Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December-2021, Volume-12, Issue-29*

# कोविड-19 एवं वैक्सिनेशन के प्रति जागरूकता: एक समाज शास्त्रीय अध्ययन (भारतीय संदर्भ में)

डॉ. रानू वर्मा
सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र,शासकीय महाविद्यालय, गोहपारू, जिला-शहडोल.

**सारांश:**
कोविड-19 या नोवेल कोरोनावायरस, इस नाम को सुनते ही मस्तिष्क में इसके द्वारा फैले भयावह त्रासदी की एक रूपरेखा खींच जाती है एवं मन में भय का संचार हो जाता है हमारे संपूर्ण जीवन काल में हमने ऐसी वैश्विक महामारी एवं उससे होने वाली भयंकर क्षति शायद ही देखी हो जिस सामान्य वातावरण में हम जीवन जी रहे थे वह पूर्णरूपेण बदल चुका है आज प्रत्येक चेहरे पर मास्क हाथों में सैनिटाइजर एवं सामाजिक दूरी जैसे व्यवहारों को अपनाया जा रहा है एवं इस वैश्विक महामारी का संपूर्ण विश्व पर प्रत्येक क्षेत्र में कितना व्यापक प्रभाव पड़ा है यह भी स्पष्ट रूप से देखा जा सकता है इस महामारी ने सामान्य जीवन को अस्त-व्यस्त कर दिया है आज मानव के लिए खुले वातावरण में श्वास लेना तक मुश्किल प्रतीत होता है।

**मुख्य शब्द:** कोविड-19, SARS, VACCINE, SANITIZER, SOCIAL DISTANCING LOCKDOWN.

**प्रस्तावना:**
सर्वप्रथम यह जानना आवश्यक होगा कि नोबेल कोरोनावायरस है क्या यह कोरोनावायरस का नया स्वरूप है जो सबसे पहले चीन के वुहान शहर में पाया गया। इस वायरस से होने वाली बीमारी को कोरोनावायरस डिजीज या कोविड-19 कहते हैं। CO-कोरोना के लिए, VI-वायरस के लिए और D-डिसीज के लिए है। पहले इस बीमारी को 2019 नोवेल कोरोनावायरस या 2019-h CoV के नाम से जाना जाता था कोविड-19 वायरस सीवियर एक्यूट रेस्पिरेट्री सिंड्रोम (SARS) से जुड़ा हुआ एक नया वायरस है कोविड-19 वायरस किसी पीड़ित व्यक्ति के खांसने छींकने से सांस के कणों के सीधे संपर्क में आने से या वायरस से प्रभावित सतह को छूने से फैलता है। इसके लक्षणों में बुखार खांसी सांस लेने में दिक्कत आदि प्रमुख हैं इसकी स्थिति गंभीर होने पर संक्रमित मरीज की मृत्यु भी हो सकती है ऐसे कोई भी लक्षण होने पर टेस्ट करवाना आवश्यक हो जाता है और जांच रिपोर्ट आने पर होम आइसोलेशन या गंभीर स्थिति होने पर मरीज को अस्पताल में भर्ती करवाना आवश्यक है।

इसके संक्रमण से बचाव हेतु कुछ उपाय अपनाना आवश्यक है जैसे:

1. बार-बार साबुन या हैंड रब से हाथ धोना चाहिए।
2. खांसते या छींकते समय टिशू पेपर या कोनी को मोड़ कर अपना मुंह और नाक ढकना तथा टिश्यू को किसी बंद कूड़ेदान में फेंकना चाहिए।
3. सैनिटाइजर का प्रयोग करना।
4. फ्लू के लक्षणों वाले किसी भी व्यक्ति के संपर्क में आने से बचें।
5. सामाजिक दूरी 6 फीट या 2 गज की दूरी बनाए रखें आदि।

कोविड-19 से बचाव हेतु निर्मित वैक्सीन की दोनों खुराक के निर्धारित अंतराल में लेना आवश्यक है। टीकाकरण के शुरुआती चरण में ऑनलाइन रजिस्ट्रेशन के पश्चात लाभार्थी को उनके रजिस्टर्ड मोबाइल नंबर पर एक एसएमएस आएगा जिसमें टीकाकरण की निर्धारित तिथि, स्थान और समय के विषय में जानकारी दी जाएगी। तत्पश्चात वैक्सीन की प्रथम खुराक लेने के बाद अपना प्रमाण पत्र डाउनलोड कर सकते हैं।

**शोध का उद्देश्य एवं उपयोगिता:** कोरोना वायरस के फैलने के फल स्वरुप जिस भयावह त्रासदी से संपूर्ण विश्व विशेषकर भारत जैसे विकासशील देश गुजर रहे हैं और जिन जिन विषम परिस्थितियों से भारतीय जनता का सामना हुआ है वह विचारणीय है। चारों तरफ सारी विश्व में चीत्कार हाहाकार एवं त्राहिमाम का माहौल रहा है ऐसे में आवश्यकता है कि हमको भी 19 को गंभीरता से लें एवं राज्य के द्वारा बनाए गए प्रोटोकॉल का दृढ़ता से पालन करें कोरोनावायरस विक महामारी को लेकर अभी भी लोग जागरुक नहीं है और इससे बचाव का एकमात्र साधन है इसके लिए बनाई गई वैक्सीन का करने से लोग डर रहे हैं इस डर को दूर करने हेतु लोगों को जागरुक करना इस शोध का प्रमुख बिंदु होगा इसके अतिरिक्त शोध कार्य के अन्य उद्देश्य निम्न प्रकार से निश्चित किए गए हैं:

1. कोरोनावायरस की भयावहता से लोगों को परिचित करवाना
2. शहरी समुदाय के साथ-साथ ग्रामीण समुदाय में भी लोगों को जागरूक करने का प्रयास करना
3. वैक्सीन को लेकर भ्रामक प्रचार प्रसार करने वालों को समझाइश देना
4. वैक्सीन के प्रति भय को (विशेषकर ग्रामीण जनता के मन से) दूर करने का प्रयास करना

**शोध प्रविधि-**

ज्ञान के क्षेत्र में निरंतर उन्नति करने के लिए शोध कार्य की महत्ता सर्वोपरि है चूंकि कोरोना काल में क्षेत्रीय गतिविधि संभव नहीं है अतः प्राथमिकता संकलन का मोबाइल के माध्यम से शोध प्रश्नावली को भेजकर उत्तर दाताओं से आंकड़े प्राप्त करने का प्रयास किया गया है साथ ही द्वितीयक तथ्य संकलन हेतु इंटरनेट संबंधित पत्र पत्रिकाओं से प्रकाशित आलेख आदि को प्रयोग में लाया गया है।

**उपकल्पना का निर्माण:**

चूंकि उपकल्पना किसी भी सामाजिक शोध कार्य को प्रारंभ करने की प्रथम सीढ़ी है अतः किसी भी अनुसंधान कार्य को प्रारंभ करने के लिए उस शोध से

**अध्ययन क्षेत्र:**

चूंकि कोरोना काल में  किसी विशिष्ट क्षेत्र में जाकर अध्ययन करना या उत्तरदाताओं के सीधे संपर्क में आकर डाटा संकलन कर पाना संभव नहीं है अतः शोध क्षेत्र को व्यापकता देते हुए मोबाइल के व्हाट्सएप ग्रुपों में प्रश्नावली के माध्यम से शोध से संबंधित तथ्यों का संकलन किया गया है:

1. विश्व में सर्वप्रथम corona का केस कहां पाया गया था?

2. Corona के क्या लक्षण हैं?

3. क्या कोरोना वायरस आपके DNA पर भी प्रभाव डालता है?

4. किस विश्व स्तरीय संगठन द्वारा कोविड-19 को महामारी घोषित किया गया?

5. स्पूतनिक वी किस देश द्वारा बनाई गई वैक्सीन है?

6. कोविड-19 के तीव्रता से फैलने के कारण क्या हैं?

7. भारत की पहली स्वदेशी वैक्सीन कौन सी थी?

8. भारत में अब तक कोविड-19 की कितनी लहर आ चुकी हैं?

5. अधिक से अधिक लोगों को वैक्सीनेशन के लिए प्रेरित करना
6. कोरोना से बचाव हेतु लोगों को मास्क सैनिटाइजर सोशल डिस्टेंसिंग जैसी आदतों को अपने दैनिक जीवन में शामिल करने के लिए प्रेरित करना
7. कोरोना से संबंधित सभी प्रोटोकॉल का स्वयं भी पालन करना एवं परिवार के लोगों व आस पड़ोस के लोगों को प्रेरित करना।

संबंधित जो प्रारंभिक विचार या परिकल्पना शोधकर्ता के मन में आते हैं उसे उपकल्पना कहते हैं। प्रस्तुत अध्ययन में निम्न उपकल्पना ओं का परीक्षण करने का प्रयास किया गया है:

1. कोविड-19 की तीव्रता से फैलने का कारण
2. कोविड-19 की भयावहता का सामान्य जनजीवन पर प्रभाव
3. कोविड-19 के सभी प्रोटोकॉल का पालन न किए जाने के कारण प्रथम व दूसरी लहर का आना
4. वैक्सीनेशन की पर्याप्त जानकारी ना होने के कारण वैक्सीन लगवाने में जनमानस की उदासीनता
5. वैक्सीनेशन को लेकर विभिन्न भ्रांतियों के फल स्वरुप लोगों के मन में भय का संचार होना।

9. कोविड-19 से ठीक होने के कितने दिन बाद आप वैक्सीन लगवा सकते हैं?

10. कोविड-19 होने का खतरा कब होगा?

11. Covid-19 के मरीज के लिए आपातकालीन लक्षण है- सांस लेने में दिक्कत, सीने में दर्द एवं बेहोश होना।

12. क्या कोविड-19 के सभी नियमों का पालन करने के बाद भी आपका वैक्सीन लगवाना आवश्यक है?

13. क्या कोविड-19 से ठीक होने के बाद भी उचित समय बाद वैक्सीन लगवाना आवश्यक है?

14. कोवीशील्ड वैक्सीन के दोनों डोज़ के बीच लगभग कितने दिनों का अंतर होना चाहिए?

15. भारत में कौन-सी वैक्सीन उपलब्ध हैं?

16. भारत में बनाई गई नई वैक्सीन का नाम क्या है?

17. भारत में कितनी उम्र के ऊपर वाले लोगों को वैक्सीन लगवाना अनिवार्य है?

18. भारत में वैक्सीन के प्रति लोगों के बीच कितनी जागरूकता है?

19. क्या आपका टीकाकरण हो गया है?

20. यदि हां, तो कितने डोज़?

21. आपने कौन सी वैक्सीन लगवाई है?

इस प्रश्न के उत्तर में 136 उत्तर दाताओं ने सही उत्तर दिया आता 136 उत्तर दाताओं ने बताया कि कोरोनावायरस प्रथम चाइना में पाया गया जबकि 7 में अमेरिका व 4 ने भारत कहा।




इस प्रश्न के उत्तर में 147 में से 132 उत्तर दाताओं ने सही उत्तर दिया जबकि 11 उत्तरदाताओं ने सर्दी जुखाम को कोरोना वायरस ने बताया तथा 1 ने सरदर्द एवं 4 उत्तरदाताओं ने खांसी बुखार बताया।




इस प्रश्न के उत्तर में 147 प्रतिक्रियाओं में से 70 उत्तर दाताओं ने नहीं में उत्तर दिया एवं 77 ने इस प्रश्न के उत्तर में 147 प्रतिक्रिया में से 70 उत्तर दाताओं ने नहीं में उत्तर दिया एवं 77 ने हां कहा।



इस प्रश्न के लिए 133 उत्तरदाताओं ने WHO कहा एवं 3 ने SAARC, 10 उत्तरदाताओं ने UNICEF व 1 ने IHO कहा।




इस हेतु 147 उत्तरदाताओं में से 114 ने रूस कहां 18 उत्तरदाताओं ने भारत व 5 ने चाइना और 10 उत्तरदाताओं ने अमेरिका कहा।




कोविड-19 के तीव्रता से फैलने के कारण हैं के लिए 147 उत्तरदाताओं में से 142 उत्तरदाताओं ने उपरोक्त सभी को चिन्हित किया तथा 02 ने मास्क ना पहनना एवं तीन ने सोशल डिस्टेंसिंग का पालन न करना बताया। सैनिटाइजर का प्रयोग न करने पर कोई प्रतिक्रिया प्राप्त नहीं हुई।



इस प्रश्न के लिए 147 उत्तरदाताओं में से 104 उत्तरदाताओं ने Covaxin, 04 ने Pfizer, 38 ने कोवीशील्ड एवं 01 उत्तरदाता ने Pneumosil कहा।




इस प्रश्न के लिए 147 उत्तरदाता में से 132 उत्तरदाताओं से सही उत्तर प्राप्त हुआ, 01 उत्तरदाता द्वारा एक कहा गया, 13 उत्तरदाताओं ने तीन कहा एवं 01 उत्तरदाता ने चार कहा।




इस प्रश्न हेतु 147 उत्तर दाताओं में से 111 उत्तर दाताओं के द्वारा सही उत्तर दिया गया, 05 के द्वारा मास्क लगाकर बाहर जाने में विकल्प का चयन किया गया, 64 में भीड़ वाले इलाकों में मास्क ना लगाने पर एवं 04 उत्तर दाताओं ने उचित दूरी बनाकर  में विकल्प का चयन किया।



इस प्रश्न के लिए 147 उत्तरदाताओं के द्वारा उत्तर प्राप्त किए गए जिसमें 135 के द्वारा सही उत्तर दिया गया वह 12 के द्वारा गलत।




इस प्रश्न के उत्तर में 147 उत्तरदाताओं में से 147 ने हां के रूप में अपना उत्तर दिया।




इस प्रश्न के लिए 147 उत्तरदाताओं से उत्तर प्राप्त हुए जिनमें से 140 ने हां कहा 04 उत्तरदाताओं ने शायद कहा, 03 ने पता नहीं कहा व नहीं के लिए कोई उत्तर नहीं प्राप्त हुआ।




इस प्रश्न के उत्तर के लिए 147 उत्तरदाताओं ने उत्तर दिया जिनमें से 136 ने 84 दिन, 03 उत्तरदाताओं ने 30 दिन व 8 उत्तरदाताओं ने 60 दिन कहा।




इस प्रश्न के लिए 147 उत्तरदाताओं ने उत्तर दिया जिसमें से 124 ने Covishield कहा, 80 ने Covaxin, 09 ने Pfizer व 30 ने Sputnik-V कहा।




इस प्रश्न के लिए 147 में से 67 उत्तरदाताओं ने सही उत्तर का चयन किया।



इस प्रश्न के लिए 147 में उत्तरदाताओं में से 138 उत्तरदाताओं ने सही उत्तर दिया।




भारत में वैक्सीन के प्रति लोगों के बीच कितनी जागरूकता है इस प्रश्न के लिए 147 उत्तरदाताओं से उत्तर में 25.2% ने बहुत अच्छी कहा 41.5% ने सामान्य कहा वह 30.6% उत्तरदाताओं ने अच्छी कहा तथा 2.7% ने अत्यंत कम कहा।




इस प्रश्न के लिए 147 उत्तर दाताओं ने उत्तर दिया जिसमें से 97.3 % उत्तर दाताओं नेहा में उत्तर दिया एवं 2.7% उत्तरदाताओं ने नहीं कहा।




प्रश्न के उत्तर में 147 उत्तर दाताओं में से 67.4% ने पहला डोज़ तथा 32.6% ने दोनों डोज़ कहा।




## निष्कर्ष:

विगत 2 वर्षों में कोरोनावायरस की विभीषिका से शायद ही कोई ऐसा व्यक्ति होगा जो प्रभावित ना हुआ हो। ना जाने कितने परिवार के लोगों को यह वायरस काल के गाल में भेज चुका है और कितने ही अबोध बालक माता-पिता विहीन हो चुके हैं। शासन, स्वास्थ्य-विभाग, सामान्य-प्रशासन एवं आम जनता के द्वारा सामान्य जनजीवन की मदद के लिए निरंतर लोग सामने आ रहे हैं। फिर भी भारत जैसे विकासशील देश में लॉकडाउन लगाने के बाद जैसे ही स्थिति कुछ सामान्य होती है लॉकडाउन खोलने के बाद लोगों के द्वारा कोरोनावायरस गाइडलाइन्स का पालन ना के बराबर किए जाने के फलस्वरूप उन्हें इसकी विक्रालता बढ़ने लगती है। 0जहां प्रथम लहर कुछ कम भयावह थी वहीं द्वितीय लहर ने लाखों लोगों को मृत्यु की शैया में सुला दिया है। अतः अब तीसरी लहर ना आए एवं आए भी तो उसके परिणाम उतने भयावह ना हो इस हेतु शासन के द्वारा विशिष्ट कदम उठाए जा रहे हैं अधिक से अधिक लोगों का टीकाकरण कराया जा रहा है ताकि आम जनता को सुरक्षित किया जा सके। टीकाकरण के महा अभियान चलाए जा रहे हैं ताकि शत-प्रतिशत टीकाकरण का कार्य पूर्ण हो सके।

## संदर्भ ग्रंथ सूची:

1. http://www.unicef.org>india>node
2. http://www.mohfw.gov.in/covid_vaccination
3. http://www.cowin.gov.in
4. https://www.mygov.in/covid-19
5. https://en.m.wikipedia.org/wiki/COVID-19_vaccination_in_India

# प्यार की दर्दभरी दास्ताँ का नाम : अमृता और साहिर

**डॉ. डिंपल सुरेश पाटिल**

सहायक प्राध्यापक (हिंदी विभाग प्रमुख) कला वाणिज्य और गृह विज्ञान महिला महाविद्यालय, जलगांव

ई मेल –patildimpal23@gamail.com

बॉलीवुड में 'अधूरी प्रेम कहानियों' का नाम लिया जाये तो अमिताभ-रेखा, सलमान-ऐश्वर्या, शाहिद-करीना जैसे और भी कई चर्चित नाम हमारे सामने आते हैं। इश्क की कोई भाषा नहीं होती है, इसे मजहब या वक्त की बेडियों से नहीं बांधा जा सकता। प्यार की कहानियों के किरदार आज भी जीवित हैं। लैला-मजनू, हीर-रांझा, सलीम-अनारकली मोहब्बत की अमर दास्तान लिखकर गए हैं, जिनके इश्क के अफसाने लोगों में बेइंतहा जुनून पैदा करते हैं। वैसे ही मोहब्बत की दुनियां में आज भी अमृता-साहिर का नाम अमर है। फिर भी गीतकार साहिर लुधियानवी और कवयित्री अमृता प्रीतम की एक अनोखी प्रेम कहानी ऐसी है जिसके बारे में बहुत से लोग नहीं जानते हैं।

‘आगे भी जाने ना तू’
‘ओ मेरी जहरजोफी’

किसी ने सोचा भी नहीं होगा कि ऐसे गीत कंपोज करने वाले साहिर लुधियानवी की जिंदगी में ऐसी दर्दनाक प्रेम कहानी होगी, जिसका दर्द आजीवन उनकी नज्म से झलकेगा| साथ ही अमृता प्रीतम भी एक प्रसिद्ध कवयित्री थीं। एक कविता 'खाली' जिसमे उन्होंने लिखा था-

‘खाली कागज भी
साफ दिल जैसा होता है
जिस पर लिख सकते है
अपनी जान किसी के नाम…’

शेरो-शायरी में भी वे बहुत माहिर थी|

‘ख्यालों की भीड में सरकता हुआ वक्त
तेरे ख्यालों के सामने थम जाता है.’

इतनी बेमिसाल शब्द-शक्ति उन दोनों के पास थी। दोनों मंझे हुये कलाकार थे। हालाँकि उनकी प्रेम कहानी एकतरफा नहीं थी, लेकिन यह अधूरी रह गई क्योंकि दोनों ने एक दुसरे को अपनी मौखिक अभिव्यक्ती नहीं दी थी|

किसी के प्यार के यादगार पल क्या हो सकते है ये कह पाना नामुमकिन है। अचानक गार्डन मे हुई मुलाकात, मॉर्निंग वॉक पर चलते हुये पसंद आया हुआ चेहरा, किसी की बोलने की अदा, किसी का गिरा हुआ रूमाल, तो किसी की स्पर्श की हुई वस्तु जैसी कई यादें जहन में होती है| साहिर और अमृता की प्रेम कहानी की यादें बना एक बिना धुली चाय की प्याली और अधजली सिगरेट|

यह प्रेम कहानी है 1944 की। जानीमानी लेखिका अमृता और उभरते गीतकार साहिर लुधियानवी पहली बार लाहौर और दिल्ली के बीच प्रीतनगर गांव में एक मुशायरे में मिले थे। अमृता की सुंदरता की तरह उनके शब्दों को भी चमक थीं। हॉल की मंद रोशनी में साहिर और अमृता का मौन मिलन हुआ। दोनों ने एक-दूसरे के लिए अपने प्यार का इजहार आंखों के जरिए ही किया। एक सच्चेकलाकार ही सच्चे कलाकार ने सच्चे कलाकार को पहली मुलाकात मे ही पहचान लिया। कार्यक्रम देर से समाप्त

हुआ। सब एक दूसरे को अलविदा कहने लगे। अगले दिन, उन सभी को अगले कार्यक्रम के लिए लोपोकी जाना था। वहां से उन्हें लाहौर लाने के लिए एक बस थी। लेकिन नियति को कुछ और ही मंजूर था। रात में बारिश हुई, लोपोकी की सड़क पर गाड़ी चलाना खतरनाक था इसलिए सभी ने पैदल चलना ही मुनासिब समझा| उस रात की बारिश का वर्णन करते हुए अमृता कहती हैं, "जब मैं रात को बारिश को देख रही थी तो मुझे लगा कि नियति ने मेरे दिल में प्यार के बीज बो दिए हैं और प्रकृति ने प्यार से उसे बारिश के रूप में सींचा है."१ कुछ दूर चलते ही साहिर के साये में अमृता की छाया समा गई। तब अमृता कहती हैं, "मुझे नहीं पता था कि मैं अपनी जिंदगी के कई साल उनके साये में बिता सकती हूं? या थककर मैं अपने ही शब्दों में खुद को संतुष्ट कर सकती हूं।"२ अमृता ने ऐसे आशय की कविता साहिर के प्रेम में रंगकर लिखी थी| लेकिन इसके पीछे की मंशा कभी जाहीर नही की थी। जब वे पहली बार मिले तब अमृता की शादी हो चुकी थी। जब अमृता मात्र ६ साल की थी तभी उनकी शादी प्रीतम सिंह नाम के शख्स से हो गई थी परंतु वह अपनी शादी से बिल्कुल भी खुश नहीं थी। दरअसल, जब साहिर ने पहली बार अमृता को देखा तो उसने अपनी मां से कहा, "वह अमृता प्रीतम है, वह आपकी बहू हो सकती थी।" ३ ए पीपल्स पोएट के लेखक अक्षय मनवानी का मानना है कि साहिर का मानना था कि “अमृता प्रीतम ही ऐसी शख्स थीं जो उन्हें कभी भी किसी भी हाल में अकेला नहीं छोड़ेंगी”| ऐसे कई मुशायरों में मौजूदगी के कारण अमृता साहिर से परिचित हुईं। परिचय प्यार में बदल गया। लेकिन यह प्यार कभी जाहीर नही हुआ| क्योंकि दोनों ने कभी एक-दूसरे से खुलकर बात नहीं की| परंतु उनका पत्राचार शुरू हो गया| वह लाहौर में था और वह दिल्ली में थी। उसके पत्रों से स्पष्ट था कि वह साहिर से प्यार करती थी। अमृता साहिर को **'मेरा शायर', 'मेरा महबूब', 'मेरा खुदा' और 'मेरा देवता'** कहकर संबोधित करती थी|। फिर भी साहिर ने कभी उससे कोई वादा नहीं किया। हो सकता है कि दोनों को प्रेमबंधन में रहना पसंद न हो, या अमृता शादीशुदा होने के कारण साहिर ने इसे व्यक्त करना उचित न समझा हो|

दोनों एक-दूसरे से मिलने की बजाय लव-लेटर लिखा करते थे और कभी मिले भी तो ज्यादा बात करने की बजाय चुप रहना पसंद करते थे। ऐसा था उनका अव्यक्त और बेमिसाल प्यार।

**'अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नहीं।'** ऐसा बेबाकी से कहने वाला कवि अमृता के करीब आने से निशब्द हो जाता था| या साहिर-अमृता ने सोचा होगा कि बिना कुछ कहे ही दिल के करीब रहने वाले शख्स को सबकुछ पता है कि दोनों के दिमाग में चल क्या रहा है। अमृता कहती हैं, “हमारे सामने दो मुख्य बाधाएं थीं, एक थी चुप्पी जो स्थायी रूप से थी और दूसरी थी भाषा। वह पंजाबी में लिखती थी और साहिर उर्दू में शायरी लिखते थे”।५

**‘मैं पल दो पल का शायर हूँ,**
**पल दो पल मेरी हस्ती है,**
**पल दो पल मेरी जवानी है।’**

कितना सामर्थ्य है इन शब्दों में। साहिर की शब्दों की निपुणता अनिर्वचनीय है। अगर उसने इन शब्दों से अपने प्यार का इजहार किया होता, तो शायद अमृता का साथ उसे जीवनभर मिल चूका होता जिसके लिए साहिर आजीवन तरसते रहे| दोनों के किंतु-परंतु के कारण दोनों ही प्यार के लिए तरसते रहे| इधर अमृता भी मशहूर कवयित्री और लेखिका थीं। उसने अपनी कविताओं 'एक मुलाकात', 'खाली जगह', 'एक पत्र', 'सिगरेट' में अपने विचार लिखे हैं, परंतु साहिर के सामने कभी एक शब्द भी बयां नहीं किया| अमृता की आत्मकथा ‘रसीदी टिकट’ में भी ऐसा महसूस होता है कि अमृता को साहिर की चुप्पी का बहुत मलाल है। वह कहती है "जब साहिर मुझसे मिलने लाहौर आए, तो मुझे लगा जैसे बगल की कुर्सी पर हमारी चुप्पी ने कब्जा कर लिया है।"६ उसने एक और किस्सा बयां किया है। “साहिर आधी सिगरेट पीने के बाद उसे

बुझाकर दूसरी जला लेते. मुलाकात के बाद जब वो चले जाते तो कमरे में उनकी पी हुई सिगरेट की महक रहती. मैं सिगरेट के बचे टुकड़ों को संभालकर रखती थी और आधी जली सिगरेट को फिर से सुलगा लेती. उन्हें जब मैं अपनी उंगलियों में पकड़ती तो लगता था कि साहिर के हाथों को छू रही हूं और ऐसे सिगरेट पीने की लत लग गई."७ उन्होंने उस आत्मकथा में साहिर का एक और किस्सा लिखा है कि साहिर ने उन्हें बताया था- 'जब वह लाहौर में थी, तो वह हमेशा उसके घर के पास आता था। मैं एक कोने की दुकान में एक पान, एक सिगरेट या एक गिलास सोडा लेकर घंटों तक तुम्हारी घर की खिड़की की तरफ ताकता रहता था।"

बाद में जब बंटवारा हुआ तो अमृता अपने पति के साथ दिल्ली चली गईं। और विभाजन के कुछ वर्षों बाद साहिर मुंबई में मशहूर हो गए। शायद इसी वजह से दोनों का प्रेम फल-फूल नही पाया। फिर भी अमृता ने हार नहीं मानी। उन्होंने अपने साहित्य के माध्यम से साहिर के साथ बिताये पलों को लिखना शुरू किया। उन्होंने 'इक थी अनीता' नामक कविता संग्रह और 'दिल्ली दीया गलियां' नामक उपन्यास में अपने अनुभव लिखे।अमृता ने 'आखरी आहट' नामक कहानी संग्रह लिखा। 1956 में उनके कविता संग्रह **'सुनहरे'** को **साहित्य अकादमी पुरस्कार** मिला। जिसे उसने साहिर के लिए ही लिखा था। 1955 में एक लघु कथा श्रंखला 'आखिरी खत' की शुरुआत साप्ताहिक उर्दू अखबार से हुई थी। जब अमृता से इस शृंखला के लिए लिखने को कहा गया तो उन्होंने कहानी लिखी 'साहिर से पहली मुलाकात'। यह कहानी छपकर भी आई, फिर भी साहिर का कोई जवाब नहीं आया। अमृता बहुत नाराज हुई| फिर एक दिन वह खुद ही साहिर से मिलने गई। तब उसने कहा, 'आखिरी ख़त' पढ़कर मैं बहुत खुश हुआ। मैं अपने सारे दोस्तों के पास यह पत्रिका दिखाने के लिए ले गया कि यह मेरे लिए लिखा गया है, लेकिन मैं इस डर से चुप रहा कि कहीं वे मेरा मज़ाक न उड़ा दें।' अमृता की जैसे सिगरेट की याद थी वैसे ही साहिर के घर में टेबल पर एक प्याला था वह बहुत दिनों तक वहीं पड़ा रहा।जब उसका दोस्त प्याला उठाने लगा तो साहिर ने उसे इसलिए उठाने नहीं दिया क्योंकि अमृता ने उस प्याले में चाय पी थी। तो यह है एक मूक प्रेम कहानी। सचमूच कितनी अबूझ और अनाकलनीय है? दोनों प्रतिभाशाली सर्जनशील व्यक्तित्व से लबालब भरे हुए| एक शायर था तो दूसरी कवयित्री| लेकिन जब भी दोनों आमने-सामने आते तो अव्यक्त चुप्पी साधे हुए। अपनी भावनाओं को व्यक्त करने के लिए उनके पास शब्द नहीं थे। जैसे दोनों ने अपना सारा शब्द सामर्थ्य दूसरों के लिए आरक्षित कर रक्खा हो। आज भी जिन गीतों को सुनते ही हम मंत्रमुग्ध हो जाते हैं, वो साहिर के ही गीत हैं-

'कभी-कभी मेरे दिल में खयाल आता है।
कि जैसे तुझको बनाया गया है मेरे लिए।'

कम से कम एक बार तो साहिर ने अमृता को ऐसा कहना चाहीए था, या अमृता ने तेजाब के गाने की तरह साहिर से कहना था-

'कुछ मेरी सुनो कुछ अपनी कहो
हो मेरे पास तो ऐसे चुप ना रहो'

काश ऐसा होता तो इस दर्दनाक लव स्टोरी का अंत कुछ हसीन मोड़ ले सकता था| बुरा तो इस बात का लगता है कि यह कहानी एकतरफा लवस्टोरी नहीं थी, फिर भी असफल तो नहीं, लेकिन अनसुनी और अनकही जरुर रह गई। अमृता की आत्मकथा 'रसीदी टिकट' की भूमिका में उन्होंने कुछ पंक्तियां लिखी। उन्होंने लिखा, 'मेरी सारी रचनाएं, क्या कविता, क्या कहानी, क्या उपन्यास, सब एक नाजायज बच्चे की तरह हैं। मेरी दुनिया की हकीकत ने मेरे मन के सपने से इश्क किया और उसके वर्जित मेल से ये रचनाएं पैदा हुईं। एक नाजायज बच्चे की किस्मत इनकी किस्मत है और इन्होंने सारी उम्र साहित्यिक समाज के माथे के बल भुगते हैं। अपनी रचनाओं का यह परिचय न सिर्फ अमृता प्रीतम के विद्रोही तेवर को बताता है, बल्कि साहित्यिक समाज के लिए उनके विक्षोभ और दुख को भी दिखाता है।

संदर्भ ग्रंथ:-

१. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. ९२

२. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. १०२

३. इंटरनेट से साभार

४. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. ९९

५. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. १००

६. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. १०५

७. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. १८२

८. रसीदी टिकट  अमृता प्रीतम पृ. १९२

## आंबेडकरवादी कोणाला म्हणावे?

**डॉ.प्रकाश जी. कांबळे**
एस.एन.डी.टी.महिला महाविद्यालय,जळगाव

एकूणच आंबेडकरी चळवळी मध्ये 'आंबेडकरवादी कोणाला म्हणावे'?या प्रश्नाची केवळ मोठ्या प्रमाणातच नव्हे; तर अतिशय अभिनीवेशी पद्धतीने चर्चा झालेली आहे.आजही कमीअधिक प्रमाणात अशी चर्चा होताना दिसते.मात्र हा प्रश्न विचारणाराच्या मनात त्याचे उत्तर तयार असते.ते असं की बाकीचे सोडून खरा आंबेडकरवादी मीच आहे.हे त्याला जरी तसं वाटत असले तरी त्यातली मजेची गोष्ट अशी की पूर्वाश्रमीच्या महार आणि आताच्या बौद्ध धम्मात जन्मलेल्या प्रत्येकाची धारणा अशी असते की आम्हीच खरे आंबेडकरवादी.मग तो डॉ.बाबासाहेबांच्या तत्त्वविचारावर प्रामाणिकपणे चालणारा असूद्यात अथवा एखादा रोज दारू पीत असला/संघाच्या शाखेवर जात असला/ सेना –भाजप आणि तत्सम प्रतिगामी विचारधारा शिरोधार्य मानणाऱ्या पक्षात काम करत असला/घरात गौरी –गणपतीच्या प्रस्थापनेबरोबरच छोटे-मोठे देवघर असले तरी त्याचा आंबेडकरवादी असण्याचा हक्क अबाधित राहतो कारण त्याचा विशिष्ट अशा जातीत जन्म झालाय म्हणून.मला अशाच आणखी एका मजेशीर गोष्टीकडे आपले लक्ष वेधायचे आहे.ते म्हणजे आंबेडकरी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेकडे.स्वतःला आंबेडकरवादी म्हणवणारे आपल्याकडे अनेकानेक राजकीय पक्ष आहेत.प्रत्येक पक्षात काम करणाऱ्या कार्यकर्त्याची /नेत्याची अशी धारणा असते की मी आणि माझाच पक्ष क्रांती करतो आहोत.बाकीचे दलाल आणि भडवे आहेत.म्हणून ते एकमेकांचे तोंडही पाहायला नकार देतात.(तरीही ते बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या लोकशाहीचे पाईक असतात.) खरेच अशी क्रांती वगैरे किमान एकाही पक्षाने केली असती तर डॉ.बाबासाहेबांनी अथक परिश्रमाने निर्माण केलेला प्रजासत्ताक आज नष्टाचर्याच्या उंबरठ्यावर येवून प्रतिक्रांतीने दस्तक दिलीच नसती.अर्थात काही पक्ष/संघटना आणि व्यक्तीही जीवाची बाजी लावून काम करताहेत ही गोष्ट जरी खरी असली तरी वरील दोन्ही भूमिका केवळ मूलतत्त्ववादी आहेत हे सत्य नाकारता येत नाही.मुळात बाबासाहेबासारख्या महामानवाला कुठल्या एका जातीत/धर्मातच नव्हे: तर राष्ट्राच्या सीमेतही बांधून ठेवता येत नाही. कारण त्यांनी संपूर्ण विश्वाला आपल्या कवेत घेतले होते.आपण जे बाबासाहेबाना विश्वमानव म्हणतो ते केवळ प्रेमापोटी लावलेले विशेषण नाही तर त्यामागे तर्कशुद्ध विचार आहे.सुरुवातीच्या फेजमध्ये ते बहिष्कृत भारताचे नेते जरूर होते मात्र नंतरच्या टप्प्यात स्वतःचा विकास करत ते अधिकच विराट झालेत.वेगळ्या शब्दात सांगायचे तर '१९२४ साली बहिष्कृत हितकारिणी सभेसारख्या छोट्या मंचावरून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात करुन संविधान सभेसारख्या राष्ट्रीय आणि बौद्ध धम्मासारख्या आंतरराष्ट्रीय मंचापर्यंत त्याचा प्रचंड असा व्याप वाढवलेला हे आपल्या लक्षात येईल'.किंवा अधिकच तात्त्विक भाषेत सांगायचे झाले तर 'आंबेडकरी विचारातील चिरंतन अंश शोधायचा प्रयत्न केल्यास सर्व प्रथम जाणवते ती समता-स्वातंत्र्य व बंधुत्त्व या तीन तत्त्वाशी असलेली बांधिलकी त्यातही समतेचे तत्त्व पायाभूत

मानलेले आढळते.अस्पृश्तेचे निराकरण ,त्यासाठी जातिसंस्थेचे उच्चाटन,आणि त्यासाठी जातिसंस्थेला आधारभूत ठरलेल्या धार्मिक संसाकृतिक मूल्यांचे व परंपरेचे विच्छेदन या आंबेडकरी विचाराचे मूळ समतेच्या वैश्विक संकल्पनेत सामावलेले आहे.जातीय परिघात आंबेडकरी विचार बंदिस्त केल्यास त्यांचा हा वैश्विक संदर्भ हरवून बसतो.'१म्हणून या विश्वमानवाचा वारसा केवळ कोणी विशिष्ट जातीत जन्माला आला म्हणून त्याला तो मिळणार नाही.जमीनदाराचा किंवा तत्समांचा मुलगा कितीही मूर्ख असला तरी बापाच्या पाश्च्यात तोच संपत्तीचा मालक होतो.बाबासाहेबांचा वारसा म्हणजे जमीनजायदाद किंवा लॉकरमध्ये ठेवलेले डबोलं नाही.'नुसत्या तसबिरीवर,नुसत्या जयंतीवर आणि नुसत्या महापरिनिर्वाण दिनाच्या समारंभावर बाबासाहेबांचा वारसा आपण चालवतो असे कोणाला वाटत असेल तर पहिल्यांदा हे समजून घेतले पाहिजे की,बाबासाहेबांचा वारसा हा केवळ वैचारिकच वारसा असू शकतो.'२ वैचारिक वारसा म्हटले की, त्यात विचाराची उत्क्रांती आलीच याचा अर्थ बाबासाहेबांच्या सगळयाच अनुयायांनी बाबासाहेबांच्या विचारला उत्क्रांत केले पाहिजे असे अजिबात अभिप्रेत नाही तर बाबासाहेबांच्या विचाराच्या तत्त्वाधिष्ठाणाप्रमाणे जीवनाची दिशा निश्चित केली पाहिज. अशी दिशा निश्चित करुन जो जीवन जगत असेल किंवा कोणी बाबासाहेबांच्या

विचारला अधिक उत्क्रांत करत असेल तर तो मग कुठल्या जातीचा आहे याला काही फारसा अर्थच राहात नाही तो खरा आंबेडकरवादी असतो.विभूतीपूजेला बाबासाहेबांचा तीव्र विरोध होता मुर्तीपूजनावर नव्हे तर त्याचे भंजन करण्यावरच माझा अधिक विश्वास आहे असे ते नेहमी म्हणत असत.त्याचबरोबर सुसंगती हा गाढवाचा गुण आहे आणि मी स्वतःला गाढव बनवू इच्छित नाही.असेही त्यांनी स्पष्टपणे बजावलेले आहे. असे असतानाही आपण त्यांच्या विचाराची पोथी करुन त्यांनाही देव्हाऱ्यात प्रतिष्ठापित केले आहे. या संदर्भातील हृदय विदीर्ण करणारे शाहीर संभाजी भगत यांचे 'भीम पुतळयात बंद केला बाई/भीम भजनात बंद केला बाई'!हे भीमगीत आपण सर्वांनी ऐकून स्वपरीक्षण करायला हवे.तथागत बुद्धही म्हणाले होते'माझे धाम्मदायाद व्हा,अमिषदायाद होवू नका.'म.जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि बाबासाहेबांच्या चळवळीचा सर्वात जास्त कशावर भर होता तर शिक्षणावर.त्यातून डोळसपणे चळवळ चालवणारा बुद्धिमंत वर्ग उदयास येईल अशी त्यांना अपेक्षा होती.मात्र तसे झाले नाही.इतकेच कशाला बाबासाहेबांचा तर या बुद्धीवाद्यांनी तेव्हाच भ्रमनिरास केला होता.इटालियन विचारवंत अँतोनिओ ग्राम्शी यांनी बुद्धिवंतांचे दोन प्रकार केले आहेत.'पहिला जैविक बुद्धीजीवी(Oraganic Intellectual)याची नाळ समाजाच्या बेंबीत जुळलेली असते.तो आपली बुद्धी समाज प्रवर्तनासाठी खर्च करत असतो.दुसरा वर्ग पारंपरिक बुद्धीजीवीचा(Traditional Intellectual).अमुलाग्र असे परिवर्तन घडत असतानाही जुन्या टिकून राहणाऱ्या परिस्थितीचे प्रतिनिधित्व हा वर्ग करत असतो.'३ तो स्वतःला स्वतंत्र,स्वायत्त आणि स्वयंभू मानून केवळ आपल्या पांडित्याचे प्रदर्शन करत असतो.आंबेडकरी चळवळीमध्ये पारंपरिक बुद्धीजीवीचीच निपज अधिक प्रमाणात झाली.ओबीसी समूहात तर याच वर्गाचा

भरणा अधिक आहे.प्रसिद्ध विचारवंत भा.लं.भोळे यांनी तर संदर्भात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे'.म.जोतीराव फुले जर आज असते तर'इतके सारे अनर्थ एका अविद्येने नव्हे;तर एका विद्येने केले असेच म्हणाले असते.'आणि ते अगदी खरे आहे.साडी-माडी आणि गाडी यापलीकडे हा वर्ग पाहायलाच तयर नाही.स्वतःचा कोश अधिक सुरक्षित करण्यात हा वर्ग मश्गुल आहे.मात्र सुरक्षित वातावरणात स्वातंत्र्य टिकत नसते हे यांना कोण सांगणार?हा वर्ग आंबेडकरवादी तर सोडा परिवर्तनाच्या चळवळी मधील फार मोठा अडथळा ठरत असतो. सुप्रसिध्द विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे यांचे यासंदर्भातले निरीक्षण फार महत्वाचे आहे.ते म्हणतात.'या देशातली क्रांती फसण्याचे प्राचीन काळापासून एक म्हत्वाचे कारण आहे की,शोषणाला बळी पडलेल्या गोठतून आलेले व ज्यांना संधी मिळाली ते लोक मागे वळून बघत नाहीत.त्यामुळे चळवळी फसतात.'४म्हणून ग्राम्शीने सांगितलेला खरा आंबेडकरवादी जैविक बुद्धीजीवी असतो.जो कसलाही आळस न करता उदिष्ट पूर्तीसाठी मिशनरी म्हणून काम करतो आणि स्वतःसह सर्वांचे जीवन सुंदर करतो.खरा आंबेडकरवादी कोणाला म्हणावे याची एक नितांत सुंदर कसोटी आपणाला तथागत बुद्धाने भिक्कू आनंदाला जो उपदेश केला त्यावरूनही लावता येईल.तथागतानी परीनिब्बान प्राप्त करण्यापूर्वी काही काळ त्यांच्याच सांगण्यानुसार आयुष्यमान आनंदानी दोन शालावृक्षाच्या मध्ये त्यांच्या शय्येची व्यवस्था केली याचे वर्णन दिघानिकायच्या पूर्वोक्त महापारीनिब्बानसुत्तात आले आहे.त्या प्रसंगी वातावरणात जे काही घडत होते,त्याचे तथागतांनी केलेले वर्णन महत्वाचे आहे.ते आनंदाना म्हणाले ,"आनंद हे दोन्ही शालवृक्ष अकाली फुलले असून ते सर्वांगानी फुलांनी बहरलेले आहेत. तथागताची पूजा करण्यासाठी ते त्याच्या शरीरावर फुलांचा वर्षाव करीत आहेत.ते त्याच्या शरीरावर फुले उधळीत आहेत. मंदार वृक्षाची दिव्य फुलेही आकाशातून त्याच्या अंगावर पडत आहेत.चंदनाचे दिव्या चूर्ण अंगावर पडत आहे.वातावरणात दिव्या वाद्यांचा आवाज आणि दिव्या संगीत चालू आहे.हे सगळे तथागताच्या पूजेसाठी चालू आहे.आनंद, खरे पहिले असता या सगळयामुळे तथागाताचा सत्कार होत नाही.परंतु आनंद,एखादा भिक्कू,भिक्कुनी उपासक वा उपासिका धम्माला अनुसरून आचरण करीत,विचार करीत, योग्य रीतीने वागून धम्म्माचे अनुसरण करीत असेल, आणि धम्माचा प्रचार प्रसार करत असेल तर तो तथागताचा सत्कार करतो,गौरव करतो,सन्मान करतो,पूजा करतो,परमपूज करुन आदर व्यक्त करतो,(असे समजावे)."खऱ्या आंबेडकर वाद्याची तरी यापेक्षा दुसरी कोणती कसोटी असू शकेल.बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराला अनुषंगुण केवळ आचरणच नव्हे; तर या क्रांती विचाराचा अथकपणे प्रचार आणि प्रसार करणारे असंख्य आंबेडकरवादी तयार झाले तर प्रतिक्रांतीचा थरकाप उडायला आणि क्रांतीचे नंदनवन फुलायला वेळ तो काय लागणार?

**संदर्भ:**

१.भोळे भ.लं.,डॉ.आंबेडकरांचा वैचारिक वारसा,पोरे ब्रदर,पृ.क्र.०७
२.तत्रैव,पृ.क्र.२६
३. भोळे भ.लं.,म.फुले वारसा आणि वसा,साकेत प्रकाशन,औरंगाबाद, पृ.क्र.२२
४.पानसरे गोविंद,धर्म,जात आणि परिवर्तनाच्या दिशा,लोकवाङमय गृह,मुंबई,तिसरी आ.२०१०, पृ.क्र.४३
५.साळुंखेआ.ह.सर्वोत्तम भूमीपुत्र:गोतम बुद्ध,लोकायत प्रकाशन,सातारा,पुनर्मूद्रन,२०१९, पृ.क्र.२२

# वृत्तबद्धतेचा ध्यास असलेली कविता : 'एखाद्या शब्दासाठी'

**प्रा. डॉ. सुरेश पाटील**
**संचालक, मूल्यमापन विभाग, य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक**

मराठी कवितेची सुरुवात आद्य कवी मुकुंदराजांनी केली असे म्हटले जाते. म्हणजे पहिली मराठी कविता लिहिण्याचा मान त्यांच्याकडे जातो. याच काळात महानुभाव वाङ्मय लिहिले गेले. महानुभाव वाङ्मयाचे काही लेखनस्त्रोत ज्ञानेश्वरपूर्व काळातही सापडतात. विशेषतः महदंबेच्या 'धवळयां'ना आद्य कविता मानली जाते. हे सारे महानुभाव वाङ्मय आणि ज्ञानेश्वरकालीन कवींचे लेखन बहुधा पद्य स्वरुपात आढळते, हा त्याचा विशेष आहे. याशिवाय ही पद्यरचना जुन्या धर्मग्रंथावर आधारित, विशिष्ट पंथ किंवा संप्रदायाचे तत्वज्ञान मांडणारी किंवा शिकविणारी होती. यानंतरच्या काळात संत कवींनी समाजातील अनिष्ट रूढी आणि परंपरांवर आघात केलेला दिसून येतो. लोकजागृती आणि समाजसुधारणा हा या लेखनामागील उद्देश दिसतो. समाजाला एकत्र बांधणारे संत वाङ्मय होते. यात तुकाराम, रामदास, नामदेव, एकनाथ, सावता, चोखोबा, निळोबा, गोरोबा, सावता इत्यादी मंडळी आघाडीवर होती.

यानंतर पंत वाङ्मय आले. पेशवाईत तंत वाङ्मय बहरले. पुढे आधुनिक कवितेचे जनक म्हणून केशवसूत पुढे आले. खऱ्या अर्थाने कौटुंबिक समस्या आणि वैयक्तिक भावविश्वाची अभिव्यक्ती केशवसुतांपासून सुरु झाली. त्यानंतर बालकवी, केशवकुमार, मर्ढेकर, तांबे, गोविंदाग्रज, कुसुमाग्रज, इंदिरा संत, शांता शेळके, करंदीकर, सुरेश भट, मंगेश पाडगावकर यांच्या रूपाने महाराष्ट्राची काव्य प्रतिभा बहरली. या काळात उच्च कोटीतील कविता मराठी साहित्याच्या पटलावर अवतरत राहिली. तिच्यामुळे मराठी भाषा, संस्कृती यांचे वैभव वाढत राहिले.

मात्रया कवितेला काही मर्यादा होत्या. एक बाब वर्षानुवर्षे साहित्य समीक्षकांना जाणवत होती. अर्थात ती एक वस्तुस्थिती होती. ती म्हणजे हे सारेच कवी उच्च मध्यमवर्गीय अनुभवविश्व मांडणारे होते. तसेच ते शहरी भागापुरते मर्यादित होते. पुणे-मुंबई-पश्चिम महाराष्ट्र आणि फार तर कोकणपुरते मर्यादित होते. अनेक लेखक कवीही याच भागातून पुढे येत आपले अनुभव मांडू लागले. याच दरम्यानच्या काळात नाशिकमध्ये कुसुमाग्रजांसारखे मोठे कवी झाले. त्यांचे काव्य आणि एकूणच साहित्य स्थलकालाच्या मर्यादा उल्लंघणारे होते. थोडक्यात काय तर स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्षे मराठी कवितेचे अनुभवविश्व विशिष्ट वर्ग आणि क्षेत्रापुरते मर्यादित राहिले. पण विसाव्या शतकातल्या साठ-सत्तरच्या दशकांनंतर परिस्थिती बदलायला लागली. पुढच्या काही वर्षांत ही परिस्थिती झपाट्याने बदलली.

**१९६० नंतरची स्थिती :**

प्रत्येक साहित्यिकाचा आपल्या लेखनामागील उद्देश वेगवेगळा असतो. पण बहुतांश लेखन आणि विशेष करून कवितालेखन बहुधा स्वान्तसुखाय असते. कधीतरी साहित्य किंवा कविता चळवळीचे हत्यार बनलेली पहावयास मिळते. अन्याय, शोषण आणि व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारण्यासाठी साधन बनते. मराठी साहित्यात विसाव्या शतकातील सत्तरच्या दशकात अशीच एक लाट आली. दया पवार, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, केशव मेश्राम, गंगाधर पानतावणे हे कवी या कुळातले. १९६० नंतर मराठी साहित्यात दलित कवितेचा प्रवाह वेगाने आला. दलित कवी वेगाने आणि आवेगाने मराठी कवितेत भर घालू लागले.

या प्रवाहाला समांतर असा नवा प्रवाह जोमाने पुढे आला. कृषी आणि ग्राम जीवनातील अनुभव आणि आशयविश्वाचे स्वच्छ प्रतिबिब ज्यात उमटू लागले. असे कवी सामान्य घरांतून आणि गावागावातून पुढे येऊ लागले. यामुळे महाराष्ट्रातल्या गावागावातली आणि कोनाकोपऱ्यातली कविता रसिकांना, अभ्यासकांना आणि समीक्षकांना गवसायला लागली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पातळीवर कृषी आणि ग्रामजीवनानुभ मांडणारे जे काही मोठी नावे आपणास दिसतात. त्यांत ना. धो. महानोर आणि इंद्रजित भालेराव यांच्याकडे आपण पाहतो. यात महानोर निखळ शेती आणि कृषीसंस्कृतीसंबंधी अनुभव मांडतात. त्यांच्या शब्दांना आणि रचनाबंधाला लोकसाहित्याची झालर दिसते. भालेराव शेतकऱ्यांच्या व्यथा मांडतात. आपली मांडणी करताना अनेकदा ते आक्रमक दिसतात.

याच परंपरेत नाशिक जिल्ह्यात प्रकाश होळकर, कमलाकर देसले, लक्ष्मण महाडिक, विजयकुमार मिठे, संदीप जगताप असे कवी पुढे आले. या पिढीतले एक कवी संतोष वाटपाडे हे आहेत.

प्रकाश होळकर, लक्ष्मण महाडिक, विजयकुमार मिठे, कमलाकर देसले आणि अगदी अलिकडचे जगताप, जिल्ह्यातले हे सारे कवी ग्रामीण-कृषक आणि वारकरी संप्रदायाच्या संस्कारातून पुढे आले. यात होळकर, विजयकुमार मिठे, संदीप जगताप हे कृषी आणि ग्रामजीवनावर भाष्य करीत, व्यथा मांडणारे करणारे तर महाडिक आणि देसले हे वारकरी संप्रदायाच्या मुशीतून तयार झालेले दिसतात. ग्रामीण तसेच कृषक समाज, त्यांच्या व्यथा आणि वारकरी संप्रदायातील मूल्यसंस्कार आविष्कृत होताना या कवींकडून दिसतात. या सर्वांचे समकालीन असूनही तसेच ग्रामीण भागातून येवूनही संतोष वाटपाडे अनेक बाबतीत वेगळे दिसतात.

**'एखाद्या शब्दासाठी...' : कवी आणि कवितांचे विश्व :**

कवी संतोष वाटपाडे हे धोडंबे, पाचोरे, खडकमाळेगाव आणि पिंपळगावसारख्या गावात राहिले. वाढले.. पण त्यांची कविता नाशिक नाशिक जिल्ह्यातल्या इतर कवींपेक्षा पूर्णतः वेगळी आहे. त्यांची शैली आणि अनुभव ग्रामीण आणि कृषक समाजापेक्षा अनेक बाबतीत कुसुमाग्रज आणि रविकिरण मंडळाच्या कवींशी मिळती जुळती आहे. पाचोऱ्यापासून जवळच चार पाच किलोमीटरवर कुसुमाग्रजांचे शिरवाडे आणि आणि पस्तीस किलोमीटरवर नाशिक आहे असल्याने हा प्रभाव असावा असावा की काय, असे वाटते.

**स्त्रीप्रधान विश्व :**

प्रस्तूत संग्रहात एकोणव्वद कविता आहेत. शेवटची पाच-सहा पृष्ठे त्यांनी वृत्त संकल्पना स्पष्ट करण्यासाठी दिली आहेत. प्रस्तुत कवितासंग्रहाचा विचार करता पंच्याहत्तर टक्याहून अधिक कविता या प्रामुख्याने स्त्री, प्रेम आणि शृंगार विषयाशी संबंधीत आहेत. अशा आशयाच्या एकूण साठ कविता या संग्रहामध्ये आहेत. यामध्ये १, ३, ४, ५, ७, १२, १४, १६, २५, ४०, ७०, ७१, ७२, ८०, ८२, ८३, ८८, ८९ अशा अठरा कविता केवळ स्त्रीविषयक आहेत. याशिवाय शृंगारावर : २, ६, ८, १३, १५, १८, २१, २२, २७, २८, ३१, ३२, ३५, ४३, ४४, ४६,४७, ४९, ५४, ५५, ६२, ६३, ६५, ६८, ६९, ७४, ७५, ७६, ८१, ८४ अशा तीस कविता आहेत. निव्वळ प्रेम या विषयावर २०, ३०, ३९, ५२, ५३, ५६, ५७, ५८, ६१, ६४, ७७, ७९ अशा बारा कविता आहेत. याशिवाय दहा कविता अशा आहेत की त्यांचा मूळ विषय वेगळा असूनही त्यांची वाटही कळत नकळत म्हणजेच स्त्री, शृंगार आणि प्रेम या विषयाकडे जाताना दिसते. म्हणजे या काव्यसंग्रहातील एकूण कवितेपैकी पंच्याहत्तर टक्के कवितेचा विषय हा प्रेम, स्त्री आणि शृंगार हा आहे. मराठी साहित्यात नवरस मानले जातात. संतोष वाटपाडेंच्या कवितेत ऐंशी टक्के शृंगाररस आवावरतांना दिसतो.

**'गावामधील पोरी'** या कवितेत,

भिजतात पावसात गावामधल्या पोरी
असतो मनात त्याच्या आपापला मुरारी
पाऊलवाट अल्लड ओलांडुनी मनाची
जातात भेटण्याला काळोखल्या दुपारी...

अशी गावागावातली प्रेमकहाणी रेखाटली आहे. संग्रहातील शहात्तर क्रमांकाच्या **'बरडावरची बोर'** या कवितेत,

भाराने वाकली कधीची बरडावरची बोर
जणू वाटते वयात आली खेड्यावरली पोर
फांदी फांदीवरी लगडले तिच्या टपोरे घोस
टपून बसले बांधावर नजरांचे काही चोर ..

खेड्यातल्या मुलीच्या तारुण्याला लगडलेल्या बोरीची उपमा कवीने दिली आहे. 'टपोरे घोस', 'पदर निसटला', 'रसरसली बोरे', 'ढिले पोलके', 'सैल नेसली भातुकलीची साडी', 'बोरे पिवळी उफाण अंगावरती' अशी शब्दयोजना कवीच्या शृंगारिक मनोविश्वाची प्रचीती देते. कवितासंग्रहातल्या दुसऱ्या क्रमांकावरील **'सांध्यछाया'**कवितेत,

तिच्या चिंब ओठातल्या केशराने झरा केशरी होत गेला जरी
मदोन्मत्त तारुण्य शोषून ओले सभोवार झाल्या शिळा केशरी ... असे शृंगारिक वर्णन दिसते.

**'वसंताची हाक'** या पंचावणाव्या कवितेत,

शेवरीच्या झाडावर एक शेवटचे पान
आली शेवरी वयात तिचे हरपले भान.. असे तरुणीच्या प्रेमविषयक नाजूक मनाचा विचार मांडताना,

चार दिवसात होईल तिचा रुतुस्राव बंद

पुन्हा लागेल मनाला रोज फुलायचा छंद .. असा थेट नवनिर्मितीकडे अंगुलीनिर्देश कवी करतो.

**'सैल वेणी'** या तेराव्या कवितेत,

निऱ्या सैल झाल्या जरा सैल वेणी, मिठी मागुनी मारली धुंद कोणी..

बटा सारल्या बोट लावून त्याने, उरी स्पर्श झाले किती तीव्रतेने

पदर हलला दंश मानेस झाला, करू काय उफ् हे जहर जीवघेणे .. असे वर्णन शृंगार रसाची भरती शिगेला पोचवताना दिसते. ही शृंगार रसाची भरती **'अत्तरफाया', 'अल्लड तरुणी'**, अशा कवितांमध्ये पठारावस्थेला जाताना दिसते. यापुढच्या पंधराव्या **'लागट गाठ'**या पंधराव्या रचनेत,

सैलावुन समर्पणाची लागट गाठ,

लाडात वळवली मान, हासली छान, सरकली पाठ.. असे संपूर्णत: शृंगारिक आणि थेट प्रणय क्रीडेचे वर्णन आले आहे. असेच शृंगारिक आणि प्रणय क्रीडेचे चित्रण **'मदनमंजिरी'** या कवितेतील,

वाजली पैंजणे मंद, तिचा बेधुंद, उसळला फाया..थिरकली उफाडी काया.. ही धुंदीही लक्षणीय आहे,

कवी अधूनमधून गाव, शेती आणि पाऊस असे विषय हाताळताना दिसतो. पण अशा जीवनानुभावातही स्त्री आणि श्रुंगाराकडे अभावितपणे वळतो. अशा अनेक कविता संग्रहात आहेत. **'जाऊ सगळे भिजून'** या कवितेत,

बांध होतील हिरवे सारा शिवार फुलेल

बळी बसला घरात त्याचा चेहरा खुलेल ... असे शेतकरी आणि शिवाराचे वर्णन करता करता,

आता येतील बाहेर अंगणात पोरीबाळी

आता रुजेल भिजेल कुण्या यौवनेची चोळी ... कवीची अशी चंचल नजर पोरीबाळी आणि चोळीकडे भिरभिरताना दिसते.

**'तुझा आरसा सांभाळ'** या कवितेत, तरुण मुलीला तिचे स्वत्व सांभाळण्याचा सल्ला देतांना कवी म्हणतो,

वाऱ्यावर उडू नये तुझा बिलोरी पदर

माय लेक तू कुणाची नाही जगाला कदर, आणि

तुझी लाजभिऊ चाल तुझे वय न्हातेधुते

पोरी पोलक्यात ठेव एक कुऱ्हाडीचे पाते, असा धिटाईयुक्त उपदेशही करतो.

**करुण रस :**

संतोष वाटपाडे यांच्या कवितेत श्रुंगार रसानंतर दुसरा भेटणारा रस म्हणजे करूण रस. **'वाकळ'** या सातव्या कवितेत फाटलेल्या वाकळातल्या वृद्धेची तगमग चितारली आहे. सगळयांची न्हाणीधुणी करण्यात उभा जन्म खर्च करणाऱ्या म्हातारीचा आता आपल्याच लोकांना वास येतो आहे.

**कृषि आणि ग्रामसंस्कृती** :

कवी वाटपाडे हे तसे ग्रामीण भागात वाढलेले. निफाड आणि नाशिक परिसरात अधिक करून राहिलेले आहेत. परंतु त्यांचे अनुभवविश्व आणि त्यातून कवितेत झालेला आविष्कार ग्रामीण आणि कृषी संस्कृतीशी जवळीक साधताना दिसत नाही. असला तरी त्याचे प्रमाण तसे बऱ्यापैकी कमी दिसते. या संग्रहात 'दुस्वप्न', 'आला पाऊस भरून',

**समकालीन विषय** :

ज्या काळात कविता लिहिले जाते, त्या काळाचे प्रतिबिंब असलेली कविता म्हणजे समकालीन कविता होय. अशी एक कविता या संग्रहात आहे. 'गर्व आमच्या जातीचा' ही वेगळी आणि समकालीन विषयाला हात घालणारी कविता

हा विषयही या कवितासंग्रहाच्या एकूण स्वभावापेक्षा तसा वेगळा आहे. **'दीपमाळ'** या कवितेत दिपामाळेच्या कडेला भिंतीवर उगवलेल्या रोपाची व्यथा मांडलेली आहे. याशिवाय उकिरडा, दासी, कोवळया पोरी, वर्णन, नशिबाचा शाप या करुण रसाची प्रचीती देणाऱ्या कविता आहेत.

'खेड्यामधली माती', 'मुंज्या' अशा कवितांमधून ते दिसते. संग्रहातील एकूण कवितांच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. 'तांबुस फडके', 'देव्हारा', 'पाणी पाणी झाले', 'तान्हे उन्ह' या चार कविता थेट निसर्गाशी नाते सांगणाऱ्या आहेत. या कविता शब्दसंपत्ती आणि रचनाबंध अशा अंगांनी परंपरागत मध्यमवर्गीय कवितांशी नाते सांगणाऱ्या अशा आहेत.

आहे. संपूर्ण संग्रहात'ही कविता अशी आहे की ती वर्तमानकाळाशी नाते सांगते आहे. आजच्या समाजात घडणाऱ्या वास्तवाचे चित्रण करते आहे. जातीपातीचे भेद चिरत जाणाऱ्या कवितेतून कवीचा पुरोगामी विचार नक्कीच भावून जातो. या कवितेत,

बालपणातच रक्तामध्ये, जात भिनवली जाते
तीच पीढी झाल्यावर मोठी, झेंडा घेउन फिरते
निळा असो वा भगवा हिरवा, काय बदलते सांगा
कुणीतरी तिसराच यातुनी, जाळ बनवितो ठिणगीचा
अन् आम्हाला अजुनी केवळ, गर्व आमच्या जातीचा...

असा समाजातल्या धगधगत्या वास्तवावर सभ्य शब्दात प्रकाश झोत टाकला आहे. समाजात सद्यस्थितीत द्वेष, जातीयता, दंगली, जाळपोळ सारे वाढले आहे. जातीचे विष बालपणापासूनच बालमनावर बिंबवले जाते. जो तो आपापल्या पंथाचा विचारांचा झेंडा फडकावीत अभिनिवेशात भटकत

**काही वेगळे विषय :**

याशिवाय काही गूढ आणि चिंतनपर कविता या संग्रहात दिसतात. यांत प्रामुख्याने **'फुटलेली एक समाधी', 'माध्यान्ह', 'डोह'** या कवितांचा उल्लेख करता येईल. तर मृत्यू या विषयावर **'आता कुठलीच वेदना नाही',** आणि **'अहेव मरण'** अशा कविता बरेच काही सांगून जातात. या संग्रहामध्ये असलेली **'नाशिक'** ही निव्वळ स्थलवर्णनपर कविता वाचकाला पाहायला मिळते. यापेक्षा वेगळ्या विषयांकडेही कवी अधूनमधून डोकावताना दिसतो. यात तात्विक विषयावरील **'मेणा'** ही कविता वेगळी आहे. कवीने आयुष्याला लाकडी मेण्याची उपमा या कवितेत दिलेली आहे. 'पंढरी एकटी फिरते', **'भाड्याची जागा', 'जन्म एक ऋचा'** या कवितांमध्ये कवीने आपले स्वतःचे तत्वज्ञान मांडले आहे. **'मी माझा सुद्धा नाही'** ही तशी आत्मपर कविता आहे. पण तरीही कवीच्या ठायी 'ती'चा विचार येतोच. निरोप कवितेत बाप आणि मुलीचे आशयविश्व चितारलेले दिसते.

या संग्रहाला ज्या कवितेचे नाव देण्यात आले ती **'एखाद्या शब्दासाठी'** ही कविता सतराव्या

**'एखाद्या शब्दासाठी...' या कवितासंग्रहाची ठळक वैशिष्टे आशयविश्व**

१ ) साहित्यलेखनात परकाया प्रवेश महत्वाचा असतो. विशेष करून स्त्री भूमिकेत जावून लेखन करणे अवघड असते. विशेषतः पुरुष साहित्यिकाने स्त्रीभूमिकेत जावून स्त्रीचे भावविश्व चितारणे हे आव्हानात्मक असते. हे आव्हान कवीने लिलया पेलले आहे. अनेक ठिकाणी कवीने स्त्रीभूमिकेत जाऊन स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण केले आहे.

२) कोणत्याही साहित्यिकाचे अनुभवविश्व तो ज्या मातीत वाढला, रुजला, ज्या संस्कारात विकसला त्यातून तयार होत असते. प्रस्तुत कवीचे अनुभव आणि आशयविश्व ग्राम आणि कृषक समाजाचे चित्रण करतेच, त्याहून ते प्रेमभावना, स्त्री, आणि शृंगार या आशयाभोवती अधिक प्रमाणात वावरताना दिसते.

असतो. यातून ठिणगी पडायला वेळ लागत नाही. कोणीतरी तिसराच या ठिणगीचे रुपांतर जाळात करतो. ही बाब मातीला अन देशालाही घातक असल्याचा पुरोगामी विचार येथे कवी मांडताना दिसतो.

क्रमांकावर आहे. कवितेतील एकूण अठ्ठ्याण्णव शब्दांपैकी सदोतीस वेळा 'एखाद्या' या शब्दाची पुनरावृत्ती झालेली आहे. **'वात्सल्य'** कवितेत गाय-वासरूच्या नात्यातील अतूट संबंध मांडले आहेत. वासरू कोठेही हंबरले तरी दूरवरच्या रानातल्या गाईच्या पान्ह्याला कळते. ही त्यांच्या नात्यातील घट्ट वीण कवीने मांडली आहे. **'धम्मकलाडू'** ही हलक्याफुलक्या खेळकर विषयावरील कविता मूळ प्रकृतीशी फारकत घेणारी अशी आहे.

जरा वेगळा विषय असलेल्या **'भाड्याची जागा'** या गझलरूपी कवितेत कवीने आपल्या शरीराला भाड्याची जागा म्हटले आहे. माणसाच्या जगण्यातली क्षणभंगुरता कवितेत ठायी ठायी व्यक्त करताना उगीच पसारा वाढवू नका असा सल्ला दिला आहे. यातूनच संग्रहवृत्तीला थारा नको असाही संदेश कवितेतून देण्यात आला आहे. **'नाशिक'** या नवव्या कवितेत गोदावरी, तिचा काठ, घाट, रामकुंड, सितागुम्फा, फुलबाजार, वाडे, वटवृक्ष, काळाराम, सुंदरनारायण असे स्थलवर्णन आलेले आहे.

३) कृषक आणि ग्रामीण आशयविश्वात शिरण्याचा प्रयत्न हा कवी करताना दिसतो. पण तेथेही नकळत कवी स्त्री आणि शृंगाराकडे वळताना दिसतो. उदाहरणार्थ, 'मी माझा सुद्धा नाही' ही आणि अशा काही कविता

४) गावाकडची जाण असल्याशिवाय 'वाकळ', 'उकिरडा खेड्यामधली माती', 'मुंज्या', 'डोह', 'गर्व आमच्या जातीचा', 'वासरू' अशा अस्सल ग्रामीण जीवनानुभव देणाऱ्या कवितांचे लेखन करणे अशक्य आहे. कवीच्या अनुभव आणि आशयविश्वात पाऊस, ऊन, वाकळ, रोप, उकिरडा, मुंज्या, डोह, वासरू,असे विषय वारंवार डोकावतात कि जे केवळ ग्राम आणि कृषक समाज आणि संस्कृतीशी संबंधीत आहेत.

**रचनाबंध**

१) मराठी कवितेचे मुख्य प्रकार तीन : भावकविता, भाष्यकविता, कथाकविता. यांपैकी वाटपाडे यांची कविता भावकवितेत मोडते. प्रतिमा आणि प्रतिकांच्या अंगाने समृद्ध आहे.

२) या संग्रहातील कवितांच्या आशय-विषयांत जागी वैविध्य दिसते. पण सादरीकरणासाठी कवीने अंगिकारलेला.. वापरलेला रचनाबंध तसेच शैली मात्र परिपक्व आणि मचलेल्या कवीसारखी आहे.

३) या कवीला कोणतीही साहित्यिक पार्श्वभूमी नाही. बरे कवीच्या शिक्षणाचा आणि नोकरीचा साहित्याशी संबंध नाही. तरी हा कवी वृत्तबद्ध कविता लिहितो. वृत्तबद्ध कविता हे एक शास्त्र असल्याचे स्वतंत्र टिपण काव्यसंग्रहाला जोडतो, हे विशेष आहे. या टिपणात मराठीचे बारा स्वर सांगीतले आहेत. वस्तुतः महाराष्ट्र शासन नियम २००९ नुसार मराठीत चौदा स्वर आहेत. पूर्वी आपण मराठी बाराखडी म्हणत असू. आता आपण चौदाखडी म्हणतो.

४) वृत्तबद्ध कविता करणे येरागबाळयाचे काम नाही. ते धाडसाचे काम आहे. त्याला अभ्यासाची जोड लागते. कवीच्या ठायी ती आहे. आणि सर्व कविता त्याचा पुरावा आहेत.

५) शब्द, काव्य, सूर, ताल, संगीत या सर्व अंगांनी विचार करता अशा कवितेची निर्मिती ही उच्च कोटीतली असते. पण अनेकदा वृत्तबद्ध रचनेसाठी कवीला अनेक जागी शब्दांची मोडतोड करावी लागते. वृत्तबद्ध कविता लेखनाच्या आग्रहामुळे काही वेळा कविता दुर्बोध आणि शब्दबंबाळ होण्याचा धोका वाढतो ऱ्हस्व-दीर्घ आणि व्याकरणिक नियमांना बगल द्यावी लागते. अशा अनेक जागा या संग्रहात आहेत. उदाहरणार्थ, कविता क्रमांक - दोन, पंधरा, पंचेचाळीस, चोपन्न, सत्तावन्न, सत्याऐंशी मधील अनुक्रमे 'रा<u>उ</u>ळाची', 'सैला<u>वु</u>न', '<u>नौ</u>वारी', 'हो<u>उ</u>', 'तहा<u>ण</u>' तसेच '<u>पी</u>ढी', 'घे<u>उ</u>न' इत्यादी ठिकाणी मोडतोड दिसते.

६) "उत्कट भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे कविता" असे वर्डस्वर्थने म्हटलेय. मात्र अनेकदा वृत्तबद्धतेच्या ध्यासाने शब्दछल करताना ही उत्कटता हरविण्याची शक्यता असते. वृत्तात बांधण्यासाठी 'ऊन' चा 'उन' करावा लागतो. व्याकरणिक नियमही मोडावे लागतात. यामुळे दुर्बोधता नकळत कवितेत शिरते. रचना तंत्रात बांधताना उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार नैसर्गिक राहात नाही. तो ओसरण्याची शक्यता वाढते. यामुळे कवितेत काव्य कमी आणि पद्य जास्त होताना दिसते. मोरोपंतांचे काव्य किंवा एकूणच पंडिती वाङ्मय अनेकांना यामुळेच दुर्बोध आणि निरस वाटते.

७) नवे शब्द तयार करून त्यांची योजना करताना क्वचित प्रसंगी ही कविता पद्याकडे झुकते. पण सारे पद्य कविता असतेच असे नाही. जाहिरातीत आणि राजकीय प्रचारांतही अनेकदा पद्याचा वापर होतो. पण ते काव्य असतेच असे नाही.

८) अनेक कवितांमध्ये अनुभवविश्व गावाकडचे, ग्रामीण.. पण मांडण्याचा बाज शहरी आहे. म्हणजे मांडणी अनेक जागी पुण्या-मुंबई-कोकणकडच्या कवींची आहे. म्हणजे धान गावातले आहे. शेतातलेच आहे. त्यावर प्रक्रिया शहरी दिसते आहे. गहू, डाळ, मसाला गावात पिकतो. त्यावर प्रक्रिया करून बाकरवडी पुण्यात नि नाशकात बनते.

९) थोडक्यात, 'एखाद्या शब्दांसाठी' या कवितासंग्रहात मुख्यत्वे मध्यमवर्गीय भावविश्व आणि आशयविश्व माडलेले दिसते. प्रामुख्याने स्त्री, स्त्री विश्व, शृंगाररस, काही अंशी करूण रस आणि काही प्रमाणात कृषक आणि ग्रामजीवनाचे दर्शन घडविणारी ही कविता या संग्रहात आहे. सर्व कविता वृत्तबद्ध आहेत, हा या काव्यसंग्रहाचा विशेष आहे. एकूण रचनाबंध, नवे स्वतंत्र शब्द आणि शब्दचमत्कृती, वापरलेल्या स्वतंत्र प्रतिमा आणि प्रतिके हे सारेच या कवीच्या परिपक्वतेची साक्ष 'एखाद्या शब्दासाठी..' कविता संग्रहात देताना दिसत आहेत.

# भारतीय स्वातंत्र्यलढा आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे योगदान

**डॉ.एस.डी. सावंत**

इतिहास विभागप्रमुख शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ई–मेल gaurisawant55@gmail.com

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात बंगालचे योगदान फार मोठे होते. विशेषतः बंगालमध्ये क्रांतिकारी चळवळ मोठ्या प्रमाणात कार्य करत होती. सुरूवातीला क्रांतिकारकांमध्ये सुभाषचंद्र बोस यांची बैठक होती. त्याच काळात ते कोलकत्त्यातील नवविकानंद समुहाचे क्रियाशील सदस्य होते. हा समूह स्वामी विवेकानंद यांच्या विचारापासून प्रेरणा घेऊन राष्ट्रकार्य करीत असे. त्यातूनच ब्रिटिश सरकार विरोधी असंतोष व क्रांतीच्या ठिणग्या बंगालमध्ये निर्माण होत गेल्या. सुभाषचंद्र बोस वडिलांच्या इच्छेमुळे इंग्लंडला गेले. आय.सी.एस. ची परीक्षा चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण होवून भारतात परतले. त्या काळात सर्व प्रकारचे सुख, ऐश्वर्य, मानसन्मान पायाशी लोळत घेण्याची संधी त्यांच्यासमोर होती मात्र त्यांनी लंडन सोडले. भारतात परत येताना त्यांना विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांची भेट झाली. त्या काळात रवींद्रनाथांनी ब्रिटिश सरकारने बहाल केलेला 'सर' हा किताब आपल्या मातृभूमीचा अपमान केल्यामुळे स्वाभिमानाने परत केला होता. तो स्वाभिमान सुभाषचंद्र बोस यांना महत्त्वाचा वाटला आणि म्हणून आय.सी.एस. ही पदवी नाकारण्याचे रवींद्रनाथ टागोर यांना कौतुक वाटत होते. त्यामुळे या दोघांचा स्नेह वाढत गेला. रवींद्रनाथ टागोर आणि महात्मा गांधी यांच्यात वैचारिक मतभेद होते. तरीही सुभाषचंद्र बोस यांना रवींद्रनाथांनी गांधीजींची भेट घेण्यास सांगितले. पुढे १६ जुलै १९२१ ला मुंबईत आल्यावर सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांची भेट घेतली.[१] त्यावेळी गांधीजीत एक संत त्यांना दिसून आला. त्यावेळी त्यांनी गांधीजीबरोबर भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाबाबत चर्चा केली. त्याच वार्षी गांधीजींनी 'एका वर्षात स्वराज्य' ही घोषणा केली होती. त्यावेळी गांधीजींनी सुभाषबाबूंना कलकत्त्यात जावून चित्तरंजन दास यांची भेट घेण्याची आणि त्यांचे नेतृत्व स्वीकारण्याची सूचना केली. पुढे लवकर सुभाषचंद्र बोस यांनी चित्तरंजन दास यांच्याबरोबर काम सुरू केले. त्यांचा विश्वास संपादन केला. या दरम्यान 'अनुशीलन' आणि 'युगांतर' हे क्रांतिकारक संघ कलकत्त्यात कार्य करीत होते.

ब्रिटिशांच्या कारावासात असलेल्या क्रांतिकारकांची पहिले महायुद्ध संपल्यावर सुटका झाली होती आणि अशा बदललेल्या परिस्थितीत काय करावे हे त्यांना सूचत नव्हते. त्यांना योग्य दिशा देवून काँग्रेसमध्ये आणण्यास सुभाषबाबूंनी प्रयत्न केला. त्यांनी त्या क्रांतिकारकांची महात्मा गांधीजी यांच्याबरोबर भेट घडवून आणली. दासबा बाबू बरोबर झालेल्या बैठकीत मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, सुभाषचंद्र बोस यांची गांधीजींशी भेट झाली. ते महात्मा गांधीजींच्या असहकार आंदोलनात सहभागी झाले.[२] पुन्हा १९२२ ला असहकाराचे आंदोलन सुरू झाले. उत्तर प्रदेशातील चौरीचोरा या गावी पोलिसांनी सत्याग्रहींना अमानुष मारहाण केली. त्यामुळे भडकलेल्या गावकऱ्यांनी ४ फेब्रुवारी या दिवशी चौरीचोरा येथे पोलिसांना चौकीत कोंडून चौकी पेटवली. २२ पोलीस यात भस्मसात झाले. अहिंसक मार्गाने चाललेल्या आंदोलनाला हिंसक वळण मिळाल्याने महात्मा गांधीनी असहकार आंदोलन स्थगित केले. त्यामुळे चित्तरंजन दास, सुभाषचंद्र बोस आणि असंख्य स्वातंत्र्य सैनिकांना 'यंग इंडिया'तील लेखाबद्दल महात्मा गांधी यांना सहा वर्षे व सुभाषचंद्र बोस, चित्तरंजन दास यांनाही सहा–सहा महिन्यांची शिक्षा झाली.[३] याच काळात बंगालमध्ये पुराने थैमान घातले होते. त्यासाठी सुभाषचंद्र बोस यांनी काही काळ कार्य केले. त्यातून त्यांच्यातील नेतृत्वाला उभारी मिळाली. त्यावेळी बंगालमधील प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष चित्तरंजन दास होते तर मोतीलाल नेहरू सरचिटणीस होते. पुढे काँग्रेस अधिवेशनात वाद निर्माण झाला आणि मोतीलाल नेहरूंनी आपल्या पदाचा राजीनामा देवून स्वराज्य पक्ष स्थापन केला. स्वराज्य पक्षाच्या धोरणाच्या प्रचारासाठी चित्तरंजन दास यांनी 'बंगलार कथा' हे बंगाली दैनिक सुरू केले. त्याच्या संपादक पदी सुभाषबाबूंची नियुक्ती केली. या दरम्यान कोलकत्ता महानगर पालिकेच्या निवडणुका झाल्या. त्यात चित्तरंजन दास यांच्या पक्षाला अधिक जागा मिळाल्या. चित्तरंजन दास महापौर झाले. तर तेथे सुभाषचंद्र बोस बिनविरोध निवडून आले होते. त्यावेळी चित्तरंजनदास यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी सुभाषचंद्र बोस यांचे नाव सूचविले. ब्रिटिश सरकारला ते मान्य करणे भाग पडले तेव्हा सुभाषबाबू मुख्य कार्यकारी अधिकारी झाले.

बंगालमधील 'युगांतर' ह्या क्रांतिकारी संघटनेशी सुभाषचंद्र बोस यांचा संबंध आहे असा अहवाल बंगाल सरकारच्या मुख्य सचिवांनी भारत सरकारला पाठवला. त्याच सुमारास मास्को येथे असलेल्या मानवेंद्रनाथ रॉय यांनी कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या परिषदेसाठी चित्तरंजन दास आणि सुभाषचंद्र बोस यांना निमंत्रित केले. हे पत्र सरकारच्या हाती लागले. तेव्हा सुभाषचंद्र बोस यांच्यावरील संशय अधिक वाढला. यावेळी क्रांतिकारक गोपीनाथ सहा यांना फासावर चढवण्यात आले. त्यांच्या हौतात्म्याचा गौरव करणारा ठराव प्रांतिक काँग्रेस परिषदेत संमत करण्यात आला; पण याविषयी गांधीजींनी नाराजी व्यक्त केली. 'गोपीनाथ सहा याला देशभक्त म्हणणारच असाल तर त्याला वाट चुकलेला देशभक्त म्हणा.' गांधीजी यांनी चित्तरंजन दास यांना पत्र लिहून कळविले. पुढच्या बैठकीतही सुधारणा सांगण्यात आली. तेव्हा सुभाषचंद्र संतापले आणि म्हणाले, एका देशभक्ताच्या हौतात्म्याची अशी अवहेलना करणे हे अत्यंत वाईट आहे. ते यामुळे अस्वस्थ झाले. शांततेच्या रक्षणासाठी शस्त्र धारण करावे तरी ते निषिद्ध म्हणता येणार नाही. त्यावेळच्या क्रांतिकारकांसोबत सुभाषचंद्र बोस यांचे संबंध आहेत यावर ब्रिटिश सरकारचा ठाम विश्वास झाला होता.[४] त्यावेळच्या बंगाल प्रांतिक सरकारने ब्रिटिशांना तसा अहवाल पाठवला होता. बंगालचे गव्हर्नर लॉर्ड लिटन हे सतत भारत सरकारच्या संपर्कात राहून सुभाषचंद्र बोस यांना अटक करण्यास संमती मागत होते. अखेर इंग्लंडहून तरी संमती देण्यात आली. २४ ऑक्टोबर १९२४ ला पहाटे चार वाजता सुभाषचंद्र बोस यांना त्यांच्या निवासस्थानावरून अटक करण्यात आली आणि अलिपूर तुरूंगात पाठविण्यात आले. चित्तरंजन दास यांनी या घटनेचा निषेध केला. त्यांच्या विरोधात दासबाबूंनी कलकत्त्यात सलग पाच दिवस वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेवून ब्रिटिशांच्या विरोधात वातावरण तयार केले. सुभाषबाबूंच्या अटकेने हे लोक संतप्त झाले होते. ब्रिटिशांकडून सुभाषबाबूंना अलिपूर मधील मंडालेच्या तुरूंगात पाठविण्यात आले. त्या तुरुंगात त्यांची प्रकृती खालावली. म्हणून त्यांना म्यानमानच्या तुरूंगात ठेवण्यात आले. तेथे अडीच वर्षे आणि एकवीस दिवस ठेवण्यात आले. १६ मे १९३७ ला त्यांना तुरूंगातून सोडण्यात आले. या दरम्यान प्रकृती खालावल्यामुळे त्यांना शिलाँगला रहावे लागले. १९२९ च्या काळात सुभाषचंद्र बोस व पंडित नेहरू अधिकाधिक जवळ येत गेले. पंडित नेहरूंनी संपूर्ण स्वातंत्र्याचा नारा दिला होता. यावेळी गांधीजींनी सुभाषचंद्र यांना काँग्रेस कार्यकारिणीतून काढून टाकले. त्यावेळेस पंडित नेहरू शांत राहिले.

त्यानंतर २ जानेवारी १९३० ला सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेस लोकशाही पक्षाची स्थापना केली. त्यांनी २६ जानेवारी १९३० हा दिवस 'संपूर्ण स्वातंत्र्याचा दिवस' म्हणून घोषणा केली. त्यावेळी त्यांनी सरकार क्रांतिकारकांना दिलेल्या वागणुकीचा निषेध त्यांनी केला. त्याबद्दल त्यांना एक वर्षाची तुरूंगवासाची शिक्षा झाली. २६ जानेवारी हा त्यांचा स्वातंत्र्य दिवस होता. ते त्या दिवशी अलिपूरच्या तुरूंगात बंदिस्त होते. पुढे १९३० हे मिठाच्या सत्याग्रहाचे वर्ष होते. पण सुभाषचंद्र बोस मात्र कैदेत होते. पुढे तुरूंगातून सुटल्यावर कलकत्त्याच्या महापौर पदाची निवडणूक लढवली, त्यात विजय मिळाला. त्यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी न्याय, समता, बंधुता ही समाजवादाची त्रिसूत्री मांडली. दरम्यान एक बंदीहुकूम मोडल्यामुळे त्यांना एक आठवड्याची शिक्षा झाली. १९३१ हे वर्ष सुरू झाल्यावर २६ जानेवारीला सुभाषबाबूंनी जाहीर केलेला दुसरा 'स्वातंत्र्यदिन' याची तयारी सुरू केली. त्या दिवशी असेही काहीही करता येवू नये म्हणून सुभाषबाबूंवर बंदी घातली गेली. ती झुगारून दिल्याने सुभाषचंद्र यांना मारहाण करण्यात आली. जखमी अवस्थेत त्यांना अटक करण्यात आली. महापौर असलेल्या सुभाषचंद्र बोस यांना सहा महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली.[५] असा अहवाल सरकारने तयार करून दिल्लीला पाठवला. हिंदूस्थान सरकारने तसा एक अहवाल तयार करून एक वटहुकूम काढून तो बंगाल सरकारला पाठवला पण त्यांना बंगालमध्ये अटक केली तर लोकांमध्ये प्रक्षोभ होईल म्हणून बंगालबाहेर असतानाच त्यांना अटक करावी असा सरकारने निर्णय घेतला. महात्मा गांधीनी पुन्हा सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. हा लढा बंगालमध्ये प्रखर करण्यासाठी सुभाषचंद्र बोस बंगालकडे जाण्यास निघाले. पण मुंबईजवळच बंगाली पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यांना मुंबईत सेवणी कारागृहात ठेवण्यात आले. सुभाषचंद्रबोस बरोबर अनेक नेत्यांनाही अटक झाली. त्यावेळी सुभाषबाबूंना कारागृहात पुन्हा क्षयरोगाने ग्रासले. पण सरकार त्यांना कलकत्त्यात हलवायला तयार नव्हते. त्यावेळी सरकारने त्यांना जर्मनी, इंग्लंड सोडून उर्वरीत युरोपमध्ये जाण्यास परवानगी दिली. पुढे इटलीच्या व्हेसेनिया किनाऱ्यावर पोहचले. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी सुभाषचंद्र बोस याठिकाणी गेले. व्हिएन्ना, ऑस्ट्रीया पुढे इंडिया हाऊसने त्यांना जर्मनीला जाण्याची अनुमती

दिली. तेथून सुभाषचंद्र प्रागला गेले. तेथे त्यांनी 'इंडियन असोसिएशन'ची स्थापना केली. आजारी असतानाही वारंवार ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी युरोपात फिरत राहिले. १९३३ ते बर्लिनला जावून पोहोचले. सुभाषचंद्र या काळात मुसोलिनी आणि काही नाझी नेत्यांना भेटले. आता सुभाषचंद्र युरोपात येवून सव्वा वर्षे झाले होते. व्हिएन्नामध्ये त्यांनी 'इंडियन स्ट्रगल' १९२०–१९३४ हा ग्रंथ लिहिला.

सुभाषचंद्र बोस ११ जानेवारी १९३८ ला पुन्हा युरोपात गेले. याच काळात १९३८ ला राष्ट्रीय काँग्रेसचे हरिपुरा अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस होते. त्यांना म.गांधीजींचा विरोध होता परंतु काँग्रेस मधील लोकांनी एकमताने सुभाषचंद्र बोस यांची निवड केली. स्वातंत्र्य संग्रामासाठी लढणाऱ्या सर्व नेत्यांनी आपापसात कितीही मतभेद असले तरी 'भारतीय स्वातंत्र्य' हे सर्वांचेच ध्येय असल्यामुळे सर्वांनी या गोष्टीकडे लक्ष केंद्रित केले. १९३९ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन त्रिपूरा येथे भरणार होते. महात्मा गांधीजींनी आपला उमेदवार म्हणून पट्टाभिसितारमय्या यांना उभे केले.

महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर इंग्लंडने भारताला स्वातंत्र्य देणे भाग पाडावे अशी सर्व सदस्यांची इच्छा होती. त्यांना भाग पाडणारा लढावू नेता सर्वांना हवा होता. पुन्हा सर्व कार्यकर्त्यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या नावाला पसंती दर्शविली. झालेल्या निवडणुकीत पट्टाभिसितारमय्या यांचा पराभव झाला आणि पुन्हा सुभाषचंद्र बोस यांचा विजय झाला. यानंतर महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस यांच्या मतभिन्नता वाढत गेली. त्यानंतर सुभाषबाबूंनी 'फॉरवर्ड ब्लॉक' ही आघाडी स्थापन केली. पुढे क्रांतिकारक विचारांचा स्वातंत्र्यसेनानी म्हणून ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर पाळत ठेवली. परंतु यापूर्वी दाहा वेळा कारावास भोगल्यामुळे त्यांच्यावर पुन्हा खटला चालवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा करावी हा ब्रिटिशांचा बेत होता. आता जन्मठेपेत आपले आयुष्य वाया जाणार हे सुभाषबाबूंना जाणवत होते. म्हणून त्यांनी देश सोडण्याचा निर्णय घेतला. १६ जानेवारी १९४१ ला 'महम्मदा झियाउद्दीन' नाव धारण करून पेशावर, काबूल मार्गे ते जर्मनीला गेले. समरलंद, मॉस्को मार्गे ते बर्लिनला पोहोचले. स्वातंत्र्य हिंदुस्थान केंद्र बनवले. त्याचे पुढे आझाद हिंदी केंद्रात रूपांतर झाले. 'जय हिंद' हा पहिला नारा देण्यात आला. तेथून त्यांना 'नेताजी' हे नाव मिळाले. अहिंसक मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी १९४२ मध्ये आझाद हिंद नभोवाणी केंद्र सुरू केले. १९४२ मध्ये आझाद हिंदी नभोवाणी केंद्र सुरू केले.[६] त्या नभोवाणीवरून सुभाषचंद्र बोस यांनी भाषण दिले. ही घटना हिंदुस्थानच्या दृष्टीने आत्यंतिक महत्त्वाची होती व नव्या युगाची चाहूल होती.

हिटलरने नकार दिल्यानंतर सुभाषचंद्र बोस जपानला गेले. अत्यंत धोकादायक असा ८ फेब्रुवारी १९४३ ते १६ मे १९४३ ला प्रवास करून साधारणतः ८८ तास एकाच जागेवर बसून सुभाषबाबूंनी प्रवास केला व ते टोकियोला पोहचले. तेथेही त्यांनी आजाद हिंद सेनेची फौज उभी केली. महिलांची एक तुकडी झाशीच्या राणीच्या नावाने निर्माण केली. त्याचवेळी सुभाषबाबूंनी आझाद हिंदी सरकारचे मंत्रिमंडळ जाहीर केले होते. त्यांच्या अनेक ठिकाणी सभा होऊ लागल्या. ६ जुलै १९४४ ला सुभाषचंद्र बोस यांनी नभोवाणीवरून गांधीजींना उद्देशून भाषण केले. 'हे राष्ट्रपिता' असे त्यांनी संबोधले. म्हणजे वैचारिक पातळीवर वैचारिक भेद असले तरी स्वातंत्र्यासाठी हे दोन्ही महापुरुष एकच होते. पुढे जपानच्या सेनेच्या मदतीने त्यांनी भारताच्या सीमेपर्यंत धडक मारली. परंतु नियतीला हे मान्य नव्हते. सुभाषचंद्र बोस यांचा विमान अपघातात मृत्यू झाला... परंतु ब्रिटिशांनी आझाद हिंद सेनेवर खटला भरला. पुन्हा लोकांचा प्रक्षोभ वाढला आणि पुन्हा वेगळ्या पद्धतीने ब्रिटिशांनी १९४७ ला भारताला स्वातंत्र्य दिले. परंतु सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्य चळवळीत तिला योगदान अनन्यसाधारण आहे.

**संदर्भ**

१. वि.स. वाळींबे, नेताजी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१५
२. विश्वास पाटील, महानायक, राजहंस प्रकाशन, पुणे, २०२०
३. क्रांत मदनलाल वर्मा, स्वाधीनता संग्राम के क्रांतिकारी साहित्य का इतिहास,
प्रविण प्रकाशन, दिल्ली २००७
४. शिशिर कुमार बोस, नेताजी चित्रमय जीवनी, रिसर्च ब्युरो, कोलकाता
५. नेताजी संपूर्ण वाङ्मय, खंड दोन प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली, २००९
६. नगरकर वसंत, भारतीय स्वातंत्र्यसंग्राम, पुणे, १९६८

# पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्रांचे अंतरण

**Dr.Sanjay Narayanrao Kaple**

G.T.Patil College Nandurbar

**सारांश**

आरोग्य म्हणजे केवळ व्याधी किवा विकलांगता याचा अभाव नव्हे, तर संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य अशी जागतिक आरोग्य संघटनेची आरोग्य विषयक संकल्पना आहे. "सर्वासाठी आरोग्य" हे उद्दिष्ट ठेवून ते साध्य करण्याची बांधीलकी राज्य शासनाने स्विकारली असून त्यासाठी गेल्या काही वर्षापासून प्रतिबंधक, प्रवर्तक, उपचारात्मक आणि पुनर्वसनात्मक आरोग्य सेवा जनतेला पुरविणेकरीता आरोग्य विषयक सुविधांचे जाळे उभारणेसाठी राज्य शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. राज्याच्या कानाकोप-यामध्ये ग्रामीण जनतेला आरोग्य विषयक सुविधा पोहचविणेसाठी उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे यांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच अलिकडे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत विविध कार्यक्रम, क्षयरोग नियंत्रण, कुष्ठरोग निर्मुलन, इ. कार्यक्रमांवर भर दिला जात आहे. पावसाळ्यामध्ये गॅस्ट्रो,, हिवताप व पाण्यामुळे होणाऱ्या इतर रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विविध उपाययोजना राबविन्यात येत आहेत. प्रस्तूत शोध निबंध हा पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्रांच्या वितरणावर आधारित आहे. यामध्ये प्रामुख्याने आरोग्य सुविधा केंद्र आणि अंतरण यांचा सहसंबंध यांचा अभ्यास केला आहे. ज्यासाठी मार्थेर यांच्या सूत्राचा वापर करण्यात आला आहे. 'एखाद्या प्रदेशातील दोन केंद्रातील अंतराला अंतरण (spacing) असे म्हणतात'. अंतरणाच्या अभ्यासामूळे प्रदेशातील आरोग्य सुविधा केंद्रांच्या कार्यक्षमतेचा व आरोग्य सुविधा उपलब्धतेच्या संदर्भात अंतराचा अभ्यास व त्याची व्यापकता जाणून घेण्याचा प्रयत्न असतो. आरोग्य सुविधा केंद्र जेवढे जवळ असतील तेवढे तेथील स्थानिक लोकांना आरोग्याच्या संदर्भात येणाऱ्या अडचणींसाठी लाभदायक ठरू शकते. याउलट आरोग्य सुविधा केंद्र स्थानिक लोकांच्या वसाहती पासून दूर वर असल्यास अशा केंद्रांपर्यंत पोचण्यास स्थानिक लोकांना अडचणींना सामोरे जावे लागते. परिणामी स्थानिक लोक दूरवर असणाऱ्या आरोग्य सुविधा केंद्रापर्यंत जाण्यास असमर्थ असू ठरू शकतात किंवा जाणे नाकारतात. परिणामस्वरूप बऱ्याच लोकांना आरोग्याच्या दृष्टीने किंवा आकस्मित अडचणी पासून वंचित राहतात. शासनाने आरोग्य सुविधा केंद्राचे स्थान व स्थितीसाठी एखाद्या गावाची किंवा शहराची लोकसंख्या पाहून निश्चित करण्यात आले आहे. ज्यामुळे त्या आरोग्य सुविधा केंद्राच्या सेवक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या वसाहती दूरवर असल्यास लाभापासून वंचित राहतात. म्हणून आरोग्य सुविधा केंद्र हे प्रदेशातील भौगोलिक परिस्थिती, जलद वाहतूक तसेच, सुगम क्षेत्रामध्ये स्थापन करणे योग्य राहते. म्हणून सदर अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**संज्ञा** अंतरण (Spacing), सहसंबंध( Correlation), आरोग्य सुविधा केंद्र.

**प्रास्ताविक**

प्रदेशातील आढळून येणाऱ्या केंद्राच्या अंतरणावरून त्या केंद्रांच्या कार्यक्षमतेचा व उपयोगितेचा अभ्यास करणे सोपे जाते. सर्वसाधारणपणे एखाद्या प्रदेशातील वेगवेगळ्या क्षेत्रांतर्गत येणाऱ्या केंद्राचे अंतरण सारखे व कमी असल्यास केंद्राच्या वितरणाची स्थिती आदर्श मानल्या जाते. आरोग्य केंद्राच्या वितरणाच्या संदर्भात अंतरणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण आरोग्य सुविधा केंद्रापासून जवळ असणाऱ्या वसाहतींना आरोग्य सुविधा त्वरित मिळण्यास मदत होते. तसेच या वसाहतीतील रुग्णांना आरोग्य सुविधा केंद्रांपर्यंत पोहोचण्यास सहज शक्य होऊ शकते. याउलट आरोग्य केंद्रापासून दुरवरील वसाहतींना आरोग्य सुविधा त्वरित मिळण्यास अंतराचा प्रभाव पडत असतो. तसेच येथील लोकांना आरोग्य सुविधा केंद्रा पर्यंत पोहोचण्यास लागणारा खर्चही जास्त होतो. त्यामुळेच दोन आरोग्य सुविधा केंद्रातील अंतरण कमी असल्यास वस्त्यांच्या अंतरणामध्ये विभाजन होऊन वसाहतीचे आरोग्य सुविधा केंद्रापासून होणारे अंतर हे कमी होते. त्यामुळे लोकांना कमी खर्चिक आणि सोयीस्कर आरोग्य सुविधा मिळण्यास मदत होते. आरोग्य सुविधा केंद्रांच्या अभिक्षेत्रीय वितरणाच्या विश्लेषणामध्ये विशेष महत्व आहे. त्याच्या माध्यमातून वाहतुकीचे जाळे, आरोग्य सुविधा केंद्रांच्या संघटित तंत्रांचा विकास करून स्थानिक नियोजन यशस्वी व प्रभावपूर्ण होऊ शकते. आरोग्य सुविधांच्या अंतरणामध्ये प्रामुख्याने दोन तथ्यांवर भर दिला जातो.

**१) लोकसंख्येची घनता**

**२) दोन आरोग्यसुविधा केंद्रामधिल अंतर.**

**अभ्यास क्षेत्र**

प्रस्तुत अभ्यासासाठी अमरावती विभागातील सातपुडा पर्वत क्षेत्राचा अभ्यासक्षेत्र म्हणून निवळ करण्यात आली आहे. हे क्षेत्र अमरावती विभागाच्या उत्तरेकडे असून मेळघाट व्याघ्रप्रकल्प, अंबाबरवा अभयारण्यचा प्रदेश म्हणून ओडखला जातो. या प्रदेशाची उत्तरेकडील सीमा महाराष्ट्राची सीमारेषा आहे तर दक्षिणेकडील सीमा सातपुडा पर्वताची समुद्रसपाटी पासून ३५० मीटर उंची असलेले क्षेत्र सिमाक्षेत्र आहे. पूर्वेकडील सीमा नागपूर, वर्धा, अमरावती जिल्ह्यांनी तर पश्चिमेकडील सीमा जालना, बुलढाणा जिल्ह्यानी सिमांकित केली आहे. पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वतीय क्षेत्राचा विस्तार पूर्व ७६°२१'४५ रेखांश ते ७८°२३' ५१" पुर्व रेखांश तर अक्षवृत्तीय विस्तार २१° १' ३२" उत्तर अक्षांश ते २१° ४४' २" उत्तर अक्षांश आहे या संपूर्ण प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ ६७९३ चौ. कि.मी आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१) पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्रांचा अभ्यास करणे.

२) आरोग्य सुविधा केंद्राच्या वितरणावर अंतरणाचा प्रभाव अभ्यासणे. आरोग्य सुविधा केंद्र आणि अंतरण यातील सहसंबंध पाहणे.

**सांख्यिकीय आणि संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबांधासाठी सातपुडा क्षेत्रातील आदिवासी आरोग्य सुविधा केंद्रांचा लोकसंख्या आकारानुसार अंतरणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करताना प्रत्यक्ष पाहणीनुसार मिळालेल्या आकडेवारीचा उपयोग केला आहे. सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य विषयीची इतर माहिती जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्हा, जिल्हा परिषद आरोग्य विभाग अमरावती, अकोला, बुलढाणा इत्यादींमधून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. वरील प्रत्येक घटकांची विभागणी तीन ते चार गटांमध्ये करण्यात आली असून प्रत्येक घटकातील सहसंबंध हा प्रतिगमन आलेखाद्वारे तपासण्यात आला आहे. त्यासाठी स्पिअरसन यांची सहसंबंध पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सहसंबंधाची सार्थकता तपासण्यासाठी t-Test चा उपयोग करण्यात आला आहे. जीआयएस (GIS) प्रणालीद्वारे नकाशे अधोरेखित करण्यात आलेले आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासासाठी प्राथमिक स्वरूपात संकलित केलेल्या माहितीवर आधारित आहे.यासाठी निरीक्षण, मुलाखती या तंत्राचा वापर केला आहे त्यासाठी प्रत्यक्ष अभ्यासक्षेत्राला भेटी देऊन माहिती संकलित केली आहे.

$$D = 1.07\sqrt{\frac{A}{N}}$$

सण १९४४ मध्ये मार्थर यांनी अंतरण मापनासाठी एका उपयुक्त सूत्रांचे प्रतिपादन केले. त्याचा उपयोग भारतातील वेगवेगळया संशोधकांनी केला आहे.

वरील सूत्रानुसार प्राप्त झालेल्या सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्राचे अंतरण तीन प्रकारामध्ये आढळून येते. ज्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे.

**सारणी, आरोग्य सुविधा केंद्रांचे अंतरण**

| तहसील | क्षेत्रफळ | आदिवासी लोकसंख्येची घनता चौ. कि.मी. | आरोग्य सुविधा केंद्र | अंतरण कि. मी. | |
|---|---|---|---|---|---|
| धारणी | १४५४ | ९७.७९ | १० | १२.९ | r= +०.४८ |
| चिखलदरा | २५०३ | ३७.१७ | ९ | १७.८४ | |
| वरूड | ७३८ | ४१.८८ | ११ | ८.७६ | |
| मोर्शी | ५४४ | २१.९१ | ४ | १२.४८ | |
| चांदुर बाजार | ४८३ | २४.०२ | ९ | ७.८४ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अचलपूर | ४३८ | ५२.४७ | ३ | | |
| अंजनगाव सूर्जी | १०८ | ६.२३ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | |
| अकोट | १०९ | ८७.८६ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | |
| तेल्हारा | ७४ | ८४.९२ | २ | ६.५ | |
| संग्रामपूर | १७६ | ९८.७६ | २ | १०.०४ | |
| जळगाव जामोद | १६६ | ५६.४९ | १ | १३.७९ | |
| एकूण | ६७९३ | ५२.१७ | ५१ | १२.३५ | |

१) **कमी अंतरणाचे क्षेत्र :** सारणीचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की, सर्वसाधारणत: कमी अंतरणाचे क्षेत्र हे आरोग्य सुविधा मिळण्यास सोयीस्कर असते. आरोग्य सुविधा केंद्राच्या अंतरणाचा प्रभाव हा मुख्यतः वाहतूक घटकांवर होत असतो. त्यामुळे कमी अंतरण असणे क्षेत्रातील लोक वस्तीना आरोग्य सुविधा केंद्रांपर्यन्त पोहोचण्यास सोयिस्कर (कमी खर्चात) ठरते. अभ्यासक्षेत्रामध्ये कमी अंतरणाच्या क्षेत्राअंतर्गत १० पेक्षा कमी अंतरण असणाऱ्या वरुड, चांदूरबाजार, आकोट, अंजनगाव सुर्जी आणि तेल्हारा या तालुक्यांच्या क्षेत्राचा समावेश होतो. आकोट व अंजनगाव सुर्जी या जिल्ह्याच्या क्षेत्रांमध्ये माहिती उपलब्ध नसल्याने मूल्य शुन्य आहे.वरुड या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ७३८ असून या तालुक्याच्या क्षेत्रांमध्ये सर्वाधिक ११ आरोग्य सुविधा केंद्रांचा समावेश आहे. या क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्रातील अंतरण हे ८.७६ कि.मी. आहे . याचा अर्थ या तालुक्याच्या क्षेत्रांमध्ये आरोग्य सुविधा केंद्रांचे अभीक्षेत्रिय वितरण चांगल्या स्वरूपाचे झाले आहे असे दिसते. चांदूर बाजार हे अभ्यासक्षेत्रातील पर्वतपदिय क्षेत्र असून या तालुक्याच्या क्षेत्राने एकूण ४८३ चौरस कि.मी. क्षेत्र व्यापले आहे. या क्षेत्रांतर्गत




एकूण ९ आरोग्य सुविधा केंद्र आहे. येथील आरोग्य सुविधा केंद्रांमधील अंतरण ७.८४ कि.मी. आहे. या क्षेत्रातील अंतरण कमी असण्याचे मुख्य कारण म्हणजे क्षेत्रफळाच्या तुलनेत आरोग्य सुविधा केंद्र जास्त आढळून येते. तेल्हारा तालुक्याचे अभ्यासक्षेत्रातील क्षेत्रफळ ७४ चौ.कि.मी. असून २ आरोग्य सुविधा केंद्र आहे. येथील आरोग्य सुविधा केंद्रांचे अंतरण ६.५ एवढे आहे. या तालुक्याचे अभ्यासक्षेत्रातील क्षेत्रफळ कमी असून आरोग्य सुविधा केंद्रांची संख्या जास्त असल्यामुळे येथील अंतरण कमी आढळून येते. जे त्या प्रदेशातील लोक वस्तीसाठी आरोग्याच्या दृष्टीने

२) चांगले आहे.

**मध्यम अंतरणाचे क्षेत्र :**

सारणीचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की, मध्यम अंतरणाच्या क्षेत्रांतर्गत १० ते १३ कि.मी. मूल्य अंतरण असणाऱ्या तालुका क्षेत्राचा समावेश आहे. ज्यामध्ये धारणी, मोर्शी, अचलपूर आणि संग्रामपूर हे तालुके आढळून येतात. धारणी तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १४५४ चौ.कि.मी. असून १० आरोग्य सुविधा केंद्र आहे. त्यांच्यातील अंतरण १२.९ कि.मी. आढळून येते. धारणी तालुका हा या प्रदेशातील सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेला तालुका आहे. थोडक्यात धारणी तालुक्याच्या क्षेत्राच्या तुलनेत उपलब्ध आरोग्य सुविधा केंद्रांची संख्या कमी असल्याने अंतरण हे जास्त आढळून येते. मोर्शी तालुका क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ५४४ चौ. कि.मी. असून ४ आरोग्य सुविधा केंद्र आहे. या तालुक्यातील आरोग्य सुविधा केंद्रांचे सरासरी अंतरण १२.८ कि. मी आहे. अभ्यास क्षेत्रातील मोर्शी हे पर्वतपदिय क्षेत्र असल्याने येथे लोकसंख्येची घनता पर्वतीय क्षेत्राच्या तुलनेत अधिक आहे. त्या कारणास्तव येथील अंतरण कमी असणे गरजेचे होते.

परंतु येथील आरोग्य सुविधा केंद्राचे अंतरण जास्त आहे. परिणामस्वरूप त्याचा परिणाम येथील आरोग्य सुविधा केंद्राच्या दूरवर वसलेल्या वसहतीवर दिसून येतो. अचलपूर तालुक्याचे अभ्यासक्षेत्रातील एकूण क्षेत्रफळ ४३८ चौ.कि.मी आहे. ज्या अंतर्गत ३ आरोग्य सुविधा केंद्र आहे. येथील आरोग्य सुविधा केंद्रातील अंतरण १२.९२ कि.मी. आहे. या तालुक्याच्या क्षेत्रांमध्ये अभ्यासक्षेत्रातील सर्वाधिक मोठे उप-जिल्हा रुग्णालय अचलपूर येथे आहे. तसेच अचलपूर हे अभ्यासक्षेत्रातील मुख्य शहर असून येथे खाजगी रूग्णालये सुद्धा उपलब्ध आहे. आरोग्याच्या संदर्भात अंतराला अनन्यसाधारण महत्त्व पाहता येथील अंतरण अपेक्षेपेक्षा जास्त असल्याचे आढळून येते. त्यामुळे त्याचा परिणाम येथील दूरवरील लोक वस्तीवर होणे साहजिकच आहे.

संग्रामपूर तालुक्याचे अभ्यासक्षेत्रातील एकूण क्षेत्रफळ १७६ चौ.कि.मी. आहे. ज्यामध्ये २ आरोग्य सुविधा केंद्र असून येथील आरोग्य सुविधा केंद्रातील अंतरण १०.०४ कि.मी आढळून येते. संग्रामपुर हा तालुका अभ्यासक्षेत्रातील पर्वतपदिय क्षेत्र आहे . परंतु या तालुक्यातील उत्तरेकडील भागामध्ये पर्वतीय क्षेत्र आहे येथील भूपृष्ठ रचनेचा आणि आरोग्य सुविधा केंद्रांचा विचार करता येथील अंतरण अपेक्षेपेक्षा जास्त आहे. थोडक्यात मध्यम अंतरणाच्या क्षेत्राचे विश्लेषण केल्यास या अंतर्गत जास्तीत जास्त क्षेत्र हे पर्वत पदीय क्षेत्र आहे. पर्वत पदिय क्षेत्रांमध्ये लोकसंख्येची घनता जास्त आढळून येते त्यामुळे अंतरणाच्या संदर्भात आरोग्य सुविधा केंद्रांचे अंतरण कमी असणे गरजेचे आहे. परंतू या क्षेत्रांमध्ये असणाऱ्या आरोग्य सुविधा केंद्रामधील अंतरण हे अधिक आढळून आले. परिणामस्वरूप त्याचा प्रभाव

४) त्यामुळे प्रदेशांच्या तुलनेत अंतरण कमी आढळून येते



आकृती क्र. ५.२

येथील लोकवसाहतीवर होत असतांना दिसून येतो. तसेच येथील आरोग्य सुविधा केंद्रापासून दूरवरील लोकवस्तीवर आर्थिक भुर्दंड बसत असल्याचे आढळून आले. परिणामस्वरूप येथील लोक वसाहतीतील रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यास नकोसे वाटते. त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतांना दिसतो. त्यामुळे अंतरणाच्या संदर्भात या क्षेत्रांमध्ये सुधारणा होणे अपेक्षित आहे.

३) **जास्त अंतरणाचे क्षेत्र :** या प्रकारचे अंतरण प्रामुख्याने चिखलदरा व जळगाव जामोद या तालुक्यात आढळून येते. येथील अंतरण मूल्य १५ कि.मी. पेक्षा जास्त आहे. चिखलदरा तालुक्याचे २५०३ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असून येथे ९ आरोग्य सुविधा केंद्र आहेत. या तालुक्यातील अंतरण मूल्य १७.८४ आहे. त्यामुळे अंतरणाच्या दृष्टिकोनातून आरोग्य सुविधा केंद्राचे सेवाक्षेत्र अधिक असल्याने येथील आरोग्य सुविधा केंद्राच्या कार्यक्षमतेवर परिणाम झालेला आढळून येते. त्यातच हे संपूर्ण क्षेत्र घनदाट वनक्षेत्राने आच्छादलेले व मेळघाट वाघ प्रकल्प म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच वाहतूक साधनांची कमतरता, दरिखोऱ्यांचा प्रदेश इत्यादी कारणांमुळे चिखलदरा तालुक्यातील आरोग्य सुविधा केंद्राच्या अंतरणामध्ये वाढ असलेली दिसून येते. जळगाव जामोद तालुक्याचे अभ्यासक्षेत्रातिल क्षेत्रफळ १६६ चौ. कि.मी. असून या क्षेत्रांमध्ये एकच आरोग्य केंद्र असल्याचे दिसते. येथील अंतरण १३.७९ एवढे आहे. जळगाव जामोद तालुक्यातील उत्तरेकडील प्रदेश हा डोंगराळ आहे तसेच या क्षेत्रात वसाहतीची संख्याही कमी आहे. याउलट दक्षिणेकडील प्रदेश हा पर्वत पदिय आहे व येथे आरोग्य सुविधा केंद्रें त्यामानाने कमी आहे.

**सातपुडा पर्वतीय क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्र आणि अंतरण यातील सहसंबंध :**

सारणी व आलेख यांचे विश्लेषण केल्यास तालुकानिहाय एकूण क्षेत्रफळ आणि आरोग्य सुविधा केंद्रातील अंतरण या दोन घटकांतील सहसंबंध हा मध्यम स्वरूपाचा असून सहसंबंध गुणक ०.४८ धनात्मक आढळून येते. याचा अर्थ अभ्यास क्षेत्रातील क्षेत्रफळामुळे आरोग्य सुविधा केंद्राच्या अंतरणाची

प्रवृत्ती ही बदलताना आढळून येते आणि तो बदल लक्षात घेण्यासारखा आहे. अभ्यास क्षेत्रातील धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यांमधील क्षेत्रफळाच्या तुलनेत आरोग्य सुविधा केंद्रांचे अंतरण उपलब्ध आरोग्य सुविधा केंद्रांच्या संख्येच्या परिणाम सार्थकता कायी स्क्वेअर चाचणीद्वारे तपासली असता $\chi^2$ मुल्य ४.५६२ असून सार्थक सूचीनुसार ९९.९० टक्के पर्यंत सार्थक ठरते. यावरून असे स्पष्ट होते की, अभ्यासक्षेत्रातील तहसील क्षेत्रफळाच्या प्रमाणामध्ये उपलब्ध आरोग्य सुविधा केंद्रांची संख्या असणे आवश्यक आहे. म्हणजेच तहसीलचे क्षेत्रफळ अधिक असल्यास आरोग्य सुविधा केंद्रांची संख्या अधिक असणे गरजेचे आहे. अन्यथा अंतरणाचा परिणाम हा तहसील क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येच्या आरोग्य सुविधा पुरविण्यास प्रतिकूल ठरू शकतो. अभ्यास क्षेत्रात अंतरणाच्या संदर्भात चिखलदरा तहसील क्षेत्रांमध्ये दयनीय परिस्थिती आढळून येते. येथील क्षेत्रफळ अधिक असून तुलनेत येथे कमी आरोग्य सुविधा केंद्र आहे. त्यामुळे या तहसील क्षेत्रात वाढ होणे गरजेचे आहे. चिखलदरा हे क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्पासाठी म्हणून राखीव ठेवण्यात आले आहे व येथील वसाहतीचे दुसरीकडे पुनर्वसन करण्याचे शासनाचे ध्येय असल्याने येथे आरोग्य सुविधा केंद्रांमध्ये वाढ होत नसावी किंवा उपलब्ध आरोग्य स्वरूप अंतरणामध्ये वाढ झालेली स्पष्ट होते. याउलट तेल्हारा या तालुक्यांमध्ये क्षेत्रफळ कमी असून तुलनेत आरोग्य सुविधा केंद्रांची संख्या जास्त आढळून येत असल्यामुळे येथे अंतरण कमी असलेले दिसून येते. आरोग्य सुविधा केंद्र व अंतरण यांची सुविधा केंद्र यांचे सुद्धा पुनर्वसन करण्याचे शासनाचे लक्ष असावे. परंतु सद्यस्थितीमध्ये उपलब्ध क्षेत्रफळाच्या तुलनेत आरोग्य सुविधा केंद्रांची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :**

पर्वत पदीय क्षेत्रापेक्षा पर्वतीय क्षेत्रांतर्गत असणाऱ्या आरोग्य सुविधा केंद्राच्या अंतरणांमध्ये वाढ असलेली दिसून येते त्यामुळे येथील आरोग्य केंद्रांच्या वितरणावर पर्वतीय क्षेत्राचा प्रभाव जास्त असून तुलनेत आरोग्य सुविधा केंद्रांची संख्या कमी आहे. त्याचप्रमाणे अभ्यासक्षेत्राचे क्षेत्रफळ अधिक असल्यामुळे सुद्धा त्याचा परिणाम अंतरणाच्या वितरणावर झालेला दिसून येतो.

पर्वत पदीय क्षेत्रांतर्गत येणाऱ्या तालुक्याचे क्षेत्रफळ कमी असल्याने व आरोग्य सुविधा केंद्र यांचे वितरण काही प्रमाणात जास्त असल्याने अंतरणावर परिणाम झालेला आहे. परिणाम स्वरूप या भागात कमी अंतरणाचे क्षेत्र असलेली दिसून येते.

**संदर्भ साहित्य :**

1. कैलास चौबे :' स्वास्थ/चिकित्सा' भूगोल, मध्यप्रदेश ग्रंथ अकादमी, भोपाळ.
2. डॉ.व्ही. के. श्रीवास्तव: 'भूगोल की सांख्यिकीय विधियां'.
3. राजेश भुरंगे. : "आदिवासी क्षेत्राचा आरोग्य दर्जा" नाथ पब्लिकेशन.
4. किंग के. जे. : " Statistical Analysis in Geography"
5. आर. पी. मिश्री. : "मेडिकल जॉग्रफी ऑफ इंडिया" नॅशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली.
6. प्रसाद हर.: "Research Methods and Techniques in Geography" Rawat Publication.
7. सी. के. कोठारी, जी. गर्ग. : "Research Methodology" methods and techniques , New Age international Publishers.
8. **Website**
9. https://www.nrhm.Maharashtra.gov.in
10. http://www.nhm.gov.in
11. http://www.mahades.maharashtra.gov.in
12. http://www.censusindia.gov.in

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December-2021, Volume-12, Issue-29

# ग्रामीण एवं शहरी क्षेत्र की कामकाजी महिलाओं की समस्याएं

**डॉ. सुनिता गजभिये**
एस.एस.एन.जे.महाविद्यालय देवली, जि. वर्धा
ई—मेल : sunitagajbhiye13@gmail.com

भारतीय महिलाओं की अलग—अलग समस्याएं होती है। इन समस्याओं के कारण भारतीय समाज में है हालांकि हिंदू धर्म में महिला देवता को देवी माता के रूप में जाना जाता है। हालांकि व्यवहार में उसकी सामाजिक स्थिति हीन है। उसका पति अपने भगवान में इतना धार्मिक आस्तीक था। महिलाओं को धार्मिक, सामाजिक, शैक्षिक, आर्थिक और राजनीतिक अधिकारों से वंचित किया गया। उसके पास कई धार्मिक और सामाजिक प्रतिबंध थे। इसने हमारे देश में महिलाओं के लिए कई तरह की समस्याएं पैदा कर दी हैं। महिलाओं को काम करने की जरूरत है। कामकाजी महिलाओं को एक ही समय में दो भूमिकाएं निभाई निभानी होती है। पहली भूमिका परिवार के संदर्भ में है। दूसरी भूमिका नौकरी के संदर्भ में है। महिलाओं के मुद्दे विशेष रूप से १९ वी सदी के समाज सुधारकों और ब्रिटिश शासकों के बीच रिफॉर्मर ऑन में सबसे पहले लोकलुभावन, बाल शास्त्री, जंभेकर, रानडे, आगरकर, महात्मा ज्योतिबा फुले का उल्लेख करना होगा। समाज में बलात्कार और उत्पीड़न के प्रकार लगातार बढ़ रहे हैं। दहेज न दे पाने के कारण लड़कियों की आत्महत्या, बच्चियों की बिक्री, उनका अपहरण, आयातित वेश्यावृत्ति की बिक्री आदि पर गंभीरता पूर्वक विचार करने की आवश्यकता है।

**परिवार**: भारत में परिवार संगठन बहुत प्राचीन है। किसी समाज के विकास की प्रथम अवस्था परिवार का निर्माण होता है।

**संयुक्त परिवार**:समाजशास्त्र में डोनल ने संदेह व्यक्त किया है कि वैदिक काल में संयुक्त परिवार व्यवस्था का कोई प्रमाण नहीं मिलता है। वैधानिक दृष्टि से संयुक्त परिवार के लिए एक साथ रहना, एक साथ खाना, संपत्ति बांटना या पूजा करना कोई आवश्यक बात नहीं है। हिंदू कानून के अनुसार यह एक संयुक्त परिवार में एक सामान्य पूर्वज के सभी वंशज होते हैं। संयुक्त परिवार में अविभाजित संपत्ति होती है।

**अलग परिवार**: परिवार प्रणाली में रिश्तेदार एक समूह की मदद पर भरोसा नहीं कर सकते हैं। खासकर अगर सेवाओं की जरूरत है। दान—दाताओं और संगठनों को इस पर निर्भर रहना पड़ता है। अस्पताल, वृद्ध आश्रम, अनाथालय और इसी तरह के संस्थान और संघठन आवश्यक सहायता प्रदान करते हैं। लेकिन उनकी मदद में एक तरह की विभिन्नता होती है।

**सामाजिक बदलाव**:

यदि किसी संगठन की संरचना या कार्य में कोई परिवर्तन होता है तो सामाजिक संगठन का यह परिवर्तनशील रूप भी सामाजिक परिवर्तन का एक रुप हो सकता है। इस संदर्भ में हमें परिवार संगठन में परिवर्तन पर विचार करना होगा। जब समाज बदलता है तो यह संगठन परिवर्तन से स्वतंत्र नहीं हो सकता है।

**कामकाजी महिलाओं की पारिवारिक और सामाजिक समस्याएं**:

**डेविड पेपिनो** के अनुसार सामाजिकरण एक ऐसी प्रक्रिया है जिसमें एक व्यक्ति एक सामाजिक मॉडल के रूप में विकसित होता है और समाज में वास्तविक जीवन जीने की क्षमता प्राप्त करता है।

**कामकाजी महिलाओं की आर्थिक समस्या**:

आधुनिक अर्थशास्त्र का एक हिस्सा दुर्लभ और बाहरी चीजें हैं जिन्हें हम इच्छाओं की पूर्ति के लिए प्राप्त करने का प्रयास करते हैं। उन्हें वित्तीय सामान या धन या संपत्ति कहा जाता है।

भारत में आज भी परिवार में महिलाओं का दर्जा पुरुषों से कम है। ससुराल वालों के साथ उनके पति और बच्चे उनसे अच्छा व्यवहार नहीं करते हैं। आज भी उनका अपनी आय पर कोई अधिकार नहीं हैं।

**योजना/लाभ**:

शहरी और ग्रामीण क्षेत्रों में काम करने वाली महिलाओं को कई समस्याओं का सामना करना पड़ता है। लेकिन इन

समस्याओं को अच्छे समाधानों से हल किया जा सकता है।

१) यद्यपि आज विभिन्न क्षेत्रों में महिलाओं के लिए पचास प्रतिशत आरक्षण है। लेकिन इस प्रस्ताव का कार्यान्वयन अभी भी पूरा नहीं हुआ है। महिलाओं के लिए रोजगार के अवसर बढ़ाए जाने चाहिए।

२) ग्रामीण और शहरी क्षेत्रों में काम करने वाली महिलाओं को पर्याप्त सुरक्षा मिलनी चाहिए। किसी भी व्यक्ति का विकास सुरक्षित वातावरण में ही अच्छा हो सकता है।

३) ग्रामीण क्षेत्रों में आर्थिक रूप से स्वतंत्र होकर भारतीय महिलाओं की स्थिति में महत्वपूर्ण प्रगति हासिल की जा सकती है। जहां महिलाओं को पापड़, अचार, मसाले, उद्योग, क्रेडिट यूनियन आदि जैसे भीड़—भाड़ वाले उद्योगों में आयोजित किया जा सकता है।

**नुकसानः**

१) कामकाजी महिलाओं की महत्वाकांक्षाए अधिक होती है। अगर उन्हें नौकरी मिलती है तो उनकी महत्वाकांक्षाएं बढ़ जाती है। इसका प्रभाव पति पर पड़ता है। वह आप अपनी पत्नी की बढ़ती महत्वाकांक्षाओं को बर्दाश्त नहीं कर सकता।

२) कामकाजी महिलाएं आर्थिक रूप से स्वतंत्र होती है और हम भी पैसा कमाते हैं वह खुद तय करती है कि पैसा कैसे खर्च किया जाए, इसीलिए पति पत्नी के बीच अक्सर झगड़े होते हैं।

३) वह उम्मीद करती है कि उसके ससुराल वाले पारिवारिक मामलों में सहयोग करेंगे। जब कि उसके ससुराल वाले पुराने जमाने के हैं। वह चाहते है कि उनकी बहू उनकी देखभाल करें। लेकिन वह अपनी नौकरी के कारण उन पर ध्यान नहीं दे पाती है। इसीलिए वह अपने ससुराल वालों से लड़ने लगती है।

**परिवर्तनकारी युग की महिलाः**

एक भारतीय महिला इस स्थिति से कब बाहर निकलेगी? **अमृता प्रीतम** ने आज की भारतीय नारी को बताया कि उसके जीवन का सफर कितना उबाऊ है।

**अध्ययन का क्षेत्रः**

किसी भी अध्ययन को संचालित करने के लिए शिक्षार्थी के लिए अध्ययन के एक विशिष्ट क्षेत्र का चयन करना आवश्यक है। इसके बिना शिक्षण प्रणाली को व्यवस्थित और सुव्यवस्थित नहीं किया जा सकता है। किसी एक क्षेत्र के चयन और उनके दृढ़ संकल्प के कारण किसी विशिष्ट क्षेत्रों में शोध प्रबंध पूरा किया जा सकता है और अध्ययन कार्य पूरा किया जा सकता है। इसीलिए शोध कार्य करते हुए उन्होंने वर्धा जिले को अपने अध्ययन के क्षेत्र के रूप में चुना और उनमें से सरकारी और अर्ध्द सरकारी और निजी क्षेत्रों में कार्यरत चयनित महिलाओं को अनुसंधान प्रणाली के लिए चुना गया।

**समस्या का विवरणः**

वर्धा जिले में कामकाजी महिलाओं की समस्याओं का अध्ययन

**शोध का उद्देश्यः**

१) कामकाजी महिलाओं की सामाजिक स्थिति का आकलन।

२) नौकरी के दौरान उत्पन्न होने वाली संघर्षो का अध्ययन।

३) नौकरी करते समय उत्पन्न होने वाले विभिन्न सामाजिक मुद्दों का अध्ययन करना।

**परिवार में विभिन्न भूमिका तथा उनकी जिम्मेदारियों को निभाते हुए संतुष्टि दिखाने वाली तालिका**

| अ.क्र. | विकल्प | आवृत्ति | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | पूरी तरह से संतुष्ट | २३६ | ३९.३३ |
| २ | कुछ—कुछ संतुष्ट | ३५६ | ५९.३३ |
| ३ | बिल्कुल संतुष्ट नहीं | ०८ | ०१.३४ |
| | कूल | ६०० | १०० |

